गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony World Leader in Air Cooling
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES
BAJAJ FINSERV
कुलर, ए.सी., फ्रीज
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

0% FINANCE AVAILABLE
G. P. ELECTRONICS
गुलमोहर रोड कॉर्नर, बडोदा बँकेजवळ, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहमदनगर. मो. 8087626414 / 9665210100

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. २४.०४.२०२४ | अंक नं. ०४५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
खरेदीवर ५% कॅशबॅक ऑफर । बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग
संगमनेर ✆ (02425) 222226 | अ.नगर ✆ (0241) 2999299 | नारायणगाव ✆ (02132) 242132

नागरी सुविधा मिळत नसल्याबाबत महिलांनी उमेदवारासमोर प्रचारादरम्यान मांडली कैफियत

घरकुल, रस्ते, पाणी, वीज, गटारी, शौचालयासह नागरी सुविधांची भिंगार उपनगरामध्ये 'वाणवा'च

नगर – केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या भिंगार छावणी परिषदेच्या हद्दीत आजही रस्ते, वीज, पाणी, गटारी, शौचालये अशा नागरी सोयी–सुविधांची वाणवा असून, येथील नागरिकांनी रात्रीच्या अंधारात आपल्या समस्यांचे गाऱ्हाणे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्यासमोर मांडले. आपण निवडून आल्यानंतर दिल्लीत जाऊन या समस्या सोडवू, असे आश्वासन लंके यांनी यावेळी दिले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ उमेदवार निलेश लंके भिंगार शहरातील इंदिरानगरमध्ये आले होते. त्याचवेळी परिसरात विजपुरवठा खंडीत होऊन सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. वीजपुरवठा हा केवळ आजच खंडीत झालेला नाही तर दररोज हीच अवस्था असल्याचे येथील महिला आणि नागरिकांनी सांगितले. आम्ही छावणी परिषदेच्या हद्दीत राहात असूनही भिंगारकरांना प्रशासनाकडून कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. केंद्र सरकारच्या घरकूल योजनेचा लाभही नगारिकांना मिळत नाही, रस्त्यांची तर अत्यंत दयनिय अवस्था झाली आहे. पावसाळ्यात चिखलातून रस्ता शोधावा लागतो. पिण्याच्या पाण्याचे कायमच दुर्भिक्ष असून, पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागते. परिसरात ड्रेनेजची अवस्था बिकट आहे. अनेक ठिकाणी ड्रेनेज नाही. ज्या ठिकाणी आहे, ते तुंबलेले असून घाण, दुर्गंधी यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या छावणी परिषद हद्दीत सार्वजनिक शौचालयाची सुविधा नाही. सांडपाण्याची व्यवस्था नाही. येथील नागरिक नरकयातना सहन करत असताना शासन आणि प्रशासन आमच्याकडे लक्ष द्यायला तयार नाही, अशी कैफियत येथील महिलांनी निलेश लंके यांच्यासमोर मांडली. त्यावर आवश्यक त्या सोयी–सुविधा भिंगारकरांना मिळतील, मी दिल्लीत गेल्यानंतर त्यासाठी पाठपुरावा करुन नागरिकांना सुविधा देऊ, असे आश्वासन यावेळी लंके यांनी दिले आहे. यावेळी भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, अभिषेक कळमकर, योगीराज गाडे, सुनील त्रिपाठी यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

'त्या' लोकांची परिस्थिती पाहून अत्यंत वाईट वाटले : निलेश लंके

भिंगारमधील इंदिरानगर परिसरात मी गेलो होतो. तेथील लोकांची परिस्थिती पाहिल्यानंतर अत्यंत वाईट वाटले. कोणत्याही लोकप्रतिनिधीला लाज वाटेल, अशी त्यांची परिस्थिती आहे. तेथील लोकांना आजही रहायला घर नाही, पिण्यासाठी पाणी नाही, लाईट नाही, सर्वत्र अस्वच्छता आहे. ड्रेनेजची व्यवस्था नाही. आज आपण म्हणतो, भारत प्रगतीपथावर आहे परंतु लोकांची अशी अवस्था असेल तर काय म्हणावं? असा सवाल करत मी निवडून आल्यानंतर येथील लोकांच्या जागेचा प्रश्न निकाली काढेन आणि सर्व सुविधा देऊन त्यांचे काम करेन, असे निलेश लंके यांनी 'नवा मराठा'शी बोलताना सांगितले.

पोलिस असल्याचे भासवून ६ लाखाचे दागिने पळविले

केडगावात व्यावसायिकाची १३ तोळ्याची सोन्याची चेन हातचलाखीने लांबविली

नगर – पोलीस असल्याचे भासवून आचारसंहिता काळात गळ्यात सोन्याची चेन घालण्यास बंदी असल्याची बतावणी करून व्यावसायिकाकडील सुमारे ६ लाखांची १३ तोळे वजनाची सोन्याची चेन दोघा भामट्यांनी हातचलाखी करत लंपास केली. केडगाव उपनगरात मंगळवारी (दि. २३) सकाळी साडेदहाच्या सुमारास ही घटना घडली.

फसवणूक व्यावसायिक झालेले बाबुराव नारायण काकडे (वय ६८ रा. राजेंद्रनगर, टोयोटा शोरुम पाठीमागे, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काकडे हे दुचाकीवरून केडगावातील त्यांच्या सुजित ट्रेडर्स दुकानात जात असताना केडगाव वेशी जवळ दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तीने त्यांना थांबण्यास सांगितले. काकडे रस्त्याच्या कडेला थांबले असता ते दोघे म्हणाले, 'आम्ही पोलीस असून आचारसंहिता चालू असताना तुम्ही सोन्याची चेन कशी घातली. आम्हाला तुमच्यावर संशय आहे, तुम्ही तुमच्या गाडीच्या डिक्कीतून गांजा घेऊन जात आहे, तुम्ही गाडीची डिक्की उघडून दाखवा व तुम्ही घातलेली सोन्याची चेन गाडीच्या डिक्कीत ठेवा'.

काकडे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेऊन गळ्यातील १३ तोळ्याची सोन्याची चेन डिक्कीत ठेवली. त्या दोन व्यक्तीने त्यांच्या हाताने डिक्की बंद करून ते दुचाकीवरून नगरच्या दिशेने गेले. काकडे देखील त्यांच्या दुकानाकडे जाण्यासाठी निघाले असता त्यांना संशय आल्याने त्यांनी थांबून डिक्की तपासली असता त्यात त्यांना सोन्याची चेन दिसून आली नाही. आपली फसवणूक झाल्याचे काकडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा अनोळखी भामट्यांच्या विरोधात भा.दं.वि. कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

नगरमध्ये 'आयपीएल'वर 'ऑनलाईन सट्टा' जोरात

तरुणाई अडकतेयं विळख्यात; पोलिसांनी एका तरुणाला पकडले

नगर – सध्या सुरू असलेल्या आयपीएल मॅचवर नगर शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन सट्टा सुरु असून यामध्ये तरुण वर्ग अडकत असून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक आणि तसेच मानसिक मनस्ताप सहन करावा लागत आहे. अशा प्रकारे ऑनलाईन सट्टा घेणाऱ्या तरुणाला कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने पकडले आहे. महेश मनोहर दुडगु (वय ३२, रा. चितळे रस्ता, तोफखाना, नगर) असे त्याचे नाव आहे.

त्याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्याच्याकडून रोकड, मोबाईल असा १२ हजार ६७० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महेश मनोहर दुडगु हा चितळे रस्त्यावरील छाया टॉकीज समोर आयपीएल मॅचवर ऑनलाईन सट्टा घेत आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली होती. त्यांनी गुन्हे शोध पथकाच्या सहायक पोलीस निरीक्षक योगीता कोकाटे, पोलीस अंमलदार शाहीद शेख, इनामदार, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे यांच्या पथकाला पंचासमक्ष कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

पथकाने रविवारी (दि. २१) रात्री साडेआठच्या सुमारास सदर ठिकाणी जाऊन खात्री केली असता आयपीएल मॅच सुरू असलेली व दोन ते तीन व्यक्ती गोलाकार बसून त्यांच्याकडील मोबाईलवर बोलताना दिसले. सदर ठिकाणी क्रिकेट बेटींग जुगार सुरू असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. दोघे जण पळून गेले तर महेश दुडगु हा पोलिसांना मिळून आला. त्याला ताब्यात घेत त्याच्याकडून रोकड, मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान नगर शहरात मोठ्या प्रमाणात आयपीएलवर ऑनलाईन सट्टा खेळला जात असून शहर पोलिसांकडून जुजबी कारवाई केली जात असल्याचे दिसून येत आहे. अनेकांचे घरे या ऑनलाईन सट्टा मुळे उध्वस्त होत असून पोलिसांनी यावर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

दुचाकीवरुन देशी–विदेशी दारुची अवैधपणे वाहतूक करणाऱ्यास पकडले

नगर – दुचाकीवरून विदेशी दारू व बिअरची वाहतूक करणाऱ्या तरुणाला तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने पकडले. जयंत दामोदर मलीक (वय २८ मुळ रा. गोविंदपूर, केसरपूर, ता. सोरो, जि. बालासोरे, उडीसा, हल्ली रा. भुतकरवाडी, नगर) असे त्याचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून विदेशी दारू, बिअर व दुचाकी असा ७३ हजार ९९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्याकडून अवैध दारू विक्री व वाहतुकीवर कारवाई केली जात आहे. एक व्यक्ती दुचाकीवरून दारू घेऊन सावेडीकडून दिल्लीगेटकडे जात असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार सुनील शिरसाठ, संदीप धामणे, दत्तात्रय कोतकर, बाळासाहेब भापसे यांच्या पथकाने मनमाड रस्त्यावर डौले हॉस्पिटलसमोर सापळा लावून संशयित दुचाकी (क्र.एमएच १६ डीडी १८) पकडली. त्यावरील तरुणाने त्याचे नाव जयंत दामोदर मलीक असे सांगितले. पंचासमक्ष दुचाकीची तपासणी केली असता त्यामध्ये विदेशी दारू व बिअर मिळून आली. पोलिसांनी दारू, बिअर, दुचाकी जप्त करून मलीक विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

SONi TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

ही जाहिरात दाखवा आणि मिळवा स्मॉल मॉकटेल फ्री..फ्री
UFO Fries & Corn
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
टिप : २००/– रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू*

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातुन
दररोज
■ नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
■ पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट –भिस्तबाग चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर, दिल्लीगेट, राज पॅलेस चौक, कायनेटिक चौक, केडगाव
पुणे ड्रॉप– वाघोली, खराडी बायपास, येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक
अमर–प्रेम हॉलिडेज
ऑफिस– चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

शिबीर । शिबीर ।। शिबीर ।।।
डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
नगरमध्ये प्रथमच जपानच्या अत्याधुनिक निहॉन कोडेन मशिनवरील EMG, EEG, NCV, VEP तपासणी शिबीर
कालावधी : १ मे २०२४ पर्यंत..
५० टक्के तपासणीत सवलत
संपर्क साधा.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136

चोरलेल्या ६ दुचाक्यांसह युवकाला आयुर्वेद कॉर्नरवर 'ठोकल्या बेड्या'

सराईत दुचाकीचोराला नगरमध्ये पकडल्यानंतर त्याच्याकडून हस्तगत केलेल्या दुचाक्यांसमवेत कोतवाली पोलिस.

नगर – नगर शहर व परिसरात उच्छाद घालणाऱ्या सराईत दुचाकी चोराला कोतवाली पोलिसांच्या पथकाने शहरातील आयुर्वेद कॉर्नरवर पकडले असून त्याच्याकडून नगर शहर परिसरातून चोरलेल्या ६ दुचाक्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. नितीन दत्तात्रय नवघरे (वय १९, रा. रेणुकावाडी, मिरी, ता. पाथर्डी) असे या चोरट्याचे नाव आहे.

नगर शहरातून महावितरण कार्यालयासमोर लावलेली हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटारसायकल दि.१७ एप्रिल रोजी दुपारी चोरीला गेली होती. याबाबत रीतेश विजय कांबळे (रा. मनोलिला नगर, बोल्हेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात २२ एप्रिलला गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी गुन्ह्याचा तपास लावण्याचे आदेश गुन्हे शोध पथकास दिले होते. त्यानुसार तपास सुरु असताना गुन्हे शोध पथकास गोपनीय माहीती मिळाली की. सदर गुन्ह्यातील चोर हा दुचाकी चोरी करण्याचे उद्देशाने आयुर्वेद कॉर्नर येथे आलेला आहे. ही माहिती मिळताच पथकाने तातडीने तेथे धाव घेत संशयित नितीन नवघरे यास पकडले. त्याच्याकडे कसून चौकशी केल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली देत यापूर्वी नगर शहरातुन वेगवेगळ्या ठिकाणाहुन एकुन ६ दुचाकी चोरल्याचे कबुल केले. तसेच चोरलेल्या दुचाक्या काढून दिल्या.

सदरची कारवाई कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या स.पो.नि. योगिता कोकाटे, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पो.हे.कॉ. शाहीद शेख, योगेश भिंगारदिवे, ए.पी.इनामदार, संदिप पितळे, पो. ना. अविनाश वाकचौरे, महिला पो.ना. संगिता बडे, पो.कॉ. अभय कदम, प्रमोद लहारे, दिपक रोहोकले, सत्यजित शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अमोल गाडे, सुजय हिवाळे, शिवाजी मोरे, सचिन लोळगे यांनी केली आहे.

BANGKOK
4N 5D THAILAND TOUR
39990/-
INCLUSIONS -
Airfares , Stay In 3* Category Hotel with Breakfast, Bangkok City Tour, Coral Island tour with Lunch , All Sightseeing & Transfers
BOOK NOW
73505 30009
73505 40009
Namoh Since 1981
www.namohtours.com

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

महावीर भगवान या महाविनाश

भगवान महावीर स्वामी यांचा जन्म कल्याणक महोत्सव झाला. आपल्या नगर शहरात तर जैनीयांची संख्या फार मोठी व लक्षणीय आहे. या दिवशी जैन धर्मातील सर्व श्रावक–श्राविका कापड बाजारातील जैन मंदिरापासून शांततेत सर्वात मोठी शोभायात्रा काढून आनंदधाम येथे गेली. शिस्तबद्ध कार्यक्रमांनी महावीर जयंती साजरी केली गेली.

नगर शहराच्या धार्मिक, अध्यात्मिक, आरोग्य, शिक्षण, व्यापार उदिम व एकूणच सर्वांगिण विकासात जैनीयांचा सिंहाचा वाटा आहे हे मान्य करावेच लागेल. सामान्यत: जैन (मारवाडी) माणूस व्यवसायात गुंतलेला असून लक्ष्मी त्यांच्यावर बहुधा प्रसन्न असते. यात वावगे नसले तरी आता नव्या पिढीने शिक्षण, ज्ञानार्जनातही अधिक लक्ष घालावे असे वाटते. कारण स्वत: महावीर स्वामींनी भौतिक संपदेचा, राज्यसत्तेचा त्याग करुन कडक तपस्या, साधना करुन जीवन सार्थकी लावले व भगवान झाले. सत्य, अहिंसा परमोधर्म, अनेकांत वाद या त्यांनी घालून दिलेल्या शिकवणीचा आम्हाला अंगीकार करावा लागेल नाही तर रजनीशांनी (हेही जैन होते) सांगितल्याप्रमाणे 'महावीर या महाविनाश' (हे त्यांचे पुस्तक आहे) अटळ आहे. सध्याच्या जागतिक अशांततेत तर महावीरांचे जीवन आदर्श आहे व राहील.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

उमेदवारी अर्ज छाननी बंद दाराआड गुपचूप न करता सर्वासमक्ष करावी

व्हिडिओ शूटिंग करून ती प्रक्रिया एलईडी वॉलद्वारे आम जनतेला दाखवावी; अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर – लोकसभा निवडणुकीसाठी दाखल होत असलेल्या उमेदवारी अर्ज छाननीची प्रक्रिया बंद दाराआड गुपचूप न करता सर्वासमक्ष करण्यात यावी. या प्रक्रियेचे इन कॅमेरा व्हिडिओ शूटिंग करून ती प्रक्रिया एलईडी वॉल द्वारे आम जनतेला दाखवावी, आणि ही निवडणुक पारदर्शी पद्धतीने सुरु असल्याचे सिध्द करावे, अशी मागणी नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले गिरीश तुकाराम जाधव यांनी जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, नगर दक्षिण लोकसभा मतदार संघात अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया असून येथे २६ एप्रिल या तारखेला अर्जाची छाननी होणार आहे. प्राप्त माहितीनुसार नगर दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या अखत्यारित ही अर्जाची छाननी बंद दाराआड करणार आहेत असे समजले आहे.

गुजरात राज्यातील सुरत मध्ये कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज, बंद दाराआड अर्जाची छाननी करून, एकतर्फी बाद ठरवण्यात आला. भाजपानं इतर पक्ष आणि अपक्ष उमेदवारांचे समुपदेशन करून त्यांचे अर्ज त्यांना मागे घ्यायला लावले आणि भाजपा उमेदवार खासदारकीच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आला.

नगर दक्षिण मध्ये अर्ज छाननी करताना इतर कोणासमोर न करता अधिकारी आपसात करणार आहेत असे समजले आहे. असे करून त्यांना नगरमध्ये सुरत प्रमाणे भाजपाचा खासदार बिनविरोध निवडून द्यायचा आहे का?

अर्ज छाननीची प्रक्रिया बंद दाराआड गुपचूप न करता ती सर्वासमक्ष करावी आणि त्याचे इन कॅमेरा व्हिडिओ शूटिंग करून ते एलईडी वॉल द्वारे बाहेर आम जनतेला दाखवावे आणि ही निवडणूक पारदर्शक पद्धतीने होते आहे हे सिद्ध करावे. अशी आपणास विनंती आहे.

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांची संख्या मोठी असून त्यामुळे प्रस्थापित उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत. केंद्रात आणि राज्यात भाजपा आणि मित्र पक्षांची सत्ता असल्या कारणाने ते या निवडणुकीत मनमानी करून प्रक्रिया राबवत आहेत. निवडणूक आयोग आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून ते सोयीचे निर्णय घेत आहेत. विरोधी उमेदवारांना विविध परवानगी देत असताना त्यांची अडवणूक होते आहे.

प्रचारादरम्यान आचारसंहितेचा भंग जर भाजप व मित्र पक्षांच्या लोकांकडून झाला तर त्याकडे ते सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहेत. यामुळे नगर दक्षिण लोकसभेची निवडणूक निकोप वातावरणात न होता लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवून ती भाजपासाठी एकतर्फी करण्याचा घाट घातला जात आहे. तेव्हा मतदान प्रक्रियेवर जनतेचा विश्वास रहावा, यासाठी अर्ज छाननीची प्रक्रिया सर्वांसमक्ष करावी अशी मागणी आम्ही करीत आहोत, असे गिरीश जाधव यांनी म्हंटले आहे.

मध्यरात्री घरावर दगडफेक करून बाप-लेकाला जिवे मारण्याचा प्रयत्न

दोघा भावांवर गुन्हा दाखल; आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर – नगर तालुक्यातील अरणगाव येथील शनी चौकातील एका घरावर दोघा भावांनी मध्यरात्री दगडफेक केली. दगडफेक केल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या बाप लेकाला मारहाण करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. मारहाणीत अन्सार मेहबूब शेख (वय २३) व त्यांचे वडिल मेहबूब शेख जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जखमी अन्सार शेख यांनी दिलेल्या जबाबावरून दोघा भावांविरूध्द खुनाचा प्रयत्न कलमानुसार नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृष्णा बाबासाहेब गुंड, गणेश बाबासाहेब गुंड (दोघे रा. अरणगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. शेख कुटुंब घरात झोपलेले असताना कृष्णा व गणेश यांनी रविवारी (दि. २१) रात्री साडेबारा वाजता घरावर दगडफेक केली. घराच्या दिशेने दगडफेक होत असल्याचे पाहून अन्सार बाहेर आले. त्यांनी दगडफेक करण्याचा जाब विचारला असता तू आम्हाला विचारणारा कोण आहेस, थांब तुझ्याकडे बघतो असे म्हणून अन्सार यांच्या दिशेने वीट फेकली ती त्यांनी हुकवली. त्यानंतर थांब तुला आता जिवंत सोडणार नाही असे म्हणून कृष्णा व गणेश यांनी अन्सारवर जिवे मारण्याच्या उद्देशाने दगडफेक केली. यात अन्सार गंभीर जखमी झाला आहे. अन्सारचे आई-वडिल भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असता त्यांना देखील शिवीगाळ केली. वडिल मेहबूब यांना खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीणचे उपअधीक्षक संपत भोसले, नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते, उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. सोमवारी (दि. २२) रात्री गुन्हा दाखल झाला असून उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, विक्रांत भालसिंग, विशाल टकले, आदिनाथ शिरसाठ, बाळू चव्हाण, निलेश खिळे यांच्या पथकाने दोघा आरोपींना अटक केली आहे.

अधिक तपास पोलिस करत आहेत.

महापालिकेची प्रशासकीय यंत्रणा 'गुंडशाही'च्या ताब्यात

माझ्यावरील हल्ल्याची निष्पक्ष चौकशी करा; जिल्हाधिकाऱ्यांना सुरज नामदे यांचे निवेदन

नगर – अहमदनगर महापालिका क्षेत्रात अराजकता निर्माण झाली असून प्रशासकीय यंत्रणा गुंडशाहीने ताब्यात घेतली आहे. माझ्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची स्वतंत्र विशेष समिती नेमून लवकरात लवकर निष्पक्ष तपासणी करून गुन्हेगारांना तात्काळ कठोर शिक्षा करावी, अशी मागणी सूरज नामदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हे स्वतः सीना नदी रुंदीकरण, स्वच्छता अशा अनेक महत्तवपूर्ण मुद्द्यांवर गेल्या दशकापासून लढा देत आहे. त्याचबरोबर शहरातील विविध सामाजिक प्रश्नांवर कायदेशीरपणे प्रशासकीय यंत्रणांना जाब विचारत आहे. शहरात सामाजिक प्रश्न अनेक आहेत. त्यावर लोक कल्याणासाठी प्रशासनाला सातत्यपूर्ण जाब विचारून संवैधानिकरीत्या प्रश्न मार्गी लावणारे खूपच कमी अगदी बोटावर मोजण्याइतपत लोक आहेत. त्यातीलच एक मी आहे.

गौरी घुमट येथील रहिवासी परिसरात जवळच तुळजा भवानी मंदीर, पार्वतीबाई डहाणूकर शाळा, जिल्हा परिषद अंगणवाडी, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान इत्यादी सामजिक व शैक्षणिक संस्था असताना हॉटेलच्या नावाखाली अवैध दारुचा गुत्ता व सट्टा, मटका, जुगार, धुम्रपान असे सर्व अवैध बेकायदेशीर धंदे चालु आहेत. या अवैध धंद्याची परिसरातील सर्व नागरिकांसह तक्रार केली म्हणून ७–८ वळे तेथे छापे (रेड) पडले होते. त्याचा राग मनात धरूनच १८ व १९ एप्रिल रोजी सुरज माझ्यावर हल्ला केला. त्या हल्ल्यातून मी बालंबाल बचावलो.

हा हल्ला म्हणजे अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात अराजकता पसरली असल्याचा एक पुरावाच आहे. सदर प्रशासकीय यंत्रणा गुंडशाहीने ताब्यात घेतली आहे असे वाटत आहे. सदर प्रकरणाची एक स्वतंत्र विशेष समिति नेमून लवकरात लवकर निष्पक्ष तपासणी करून गुन्हेगारांना तात्काळ कठोर शिक्षा करावी न्याय मिळवून द्यावा अशी मागणी नामदे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत नगरमध्ये गुंडांचे पॉलिटिकल प्रमोशन

'फकीर' निलेश लंके दिल्ली गाजवणारच : किरण काळे

नगर – महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश लंके यांनी उमेदवारी अर्ज भरले. नगरकरांनी दोन्ही पॅटर्न पाहिले. भाजप उमेदवाराच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सभेला आणि रॅलीत गुंडांचे पोस्टर्स झळकले. दहशतीचा सो–धा पॅटर्न गुंड कार्यकर्त्यांसह रॅलीत सहभागी झालेला पहायला मिळाला. मुख्यमंत्र्यांच्या सभेला अनेक गुंडांची उपस्थिती होती. तर दुसऱ्या बाजूला निलेश लंके यांनी अत्यंत साधेपणाने अर्ज दाखल केला आहे. अंध, अपंग बांधवांना सोबत घेत अर्ज दाखल केला आहे. फकीर असणाऱ्या निलेश लंके यांचा विजय निश्चित असून ते दिल्ली देखील जनशक्तीच्या पाठबळावर नक्कीच गाजवतील असा विश्वास शहर कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी यांनी व्यक्त केला आहे.

किरण काळे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्र्यांच्या सभेसाठी सकाळी ९ ते ५ या वेळेत बाजारपेठेत नो व्हेईकल झोनचा आदेश प्रशासनाने जारी केला. यामुळे व्यापारी, फेरीवाले, हातगाडीवाले, हातावर पोट भरणारे, गोरगरीब, कष्टकरी या सगळ्यांचे व्यावसायिक नुकसान झाले. जनसंवाद यात्रेची सांगता नगर शहरातच शरद पवार, बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत केली. मात्र यावेळी व्यापाऱ्यांना वेठीस धरले नाही. लंकेंसाठी शहर आणि ग्रामीण भागातून माणसे आपुलकीतून स्वयंस्फुर्तीने सभेला आली होती. तर भाजप उमेदवाराला भाडोत्री माणसं गोळा करावी लागली. हा त्यांचा निवडणुकीच्या रणांगणात उतरण्या आधीच पराभव झाल्याचे चिन्ह आहे.

ज्यांच्यावर हत्याकांड, जिल्हा पोलीस अधीक्षक हल्ला, धमकावणे, ताबेमारी असे गंभीर आरोप आहेत अशांचे पोस्टर्स भाजप उमेदवाराच्या रॅलीत झळकले. यातून बाजारपेठेत व्यापारी आणि मतदारांवर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. निलेश लंके हे २४ तास ३६५ दिवस उपलब्ध असणारे स्व. अनिल राठोड यांच्यासारखे भावी मोबाईल खासदार आहेत. मतदारांनी विरोधकांच्या दहशतीला बळी पडू नये. लंके यांना रात्री अपरात्री आपण केव्हाही हाक द्या, कॉंग्रेसला हाक द्या, तुमच्या मदतीसाठी आम्ही तत्परतेने धावून येऊ, असे आवाहन काळे यांनी नगरकरांना केले आहे.

सोयऱ्याधायऱ्यांच्या फोटोंमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता

खा. सुजय विखे पा. यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी नगर शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीत 'सोधा' पक्षातील नेत्यांचाच बोलबाला दिसून आला. संदिप कोतकर, भानुदास कोतकर, माजी आ. शिवाजीराव कर्डिले, अरुण जगताप आणि आ. संग्राम जगताप हेच या रॅलीत हिरो ठरले. त्यांचे फोटो सर्वत्र झळकत होते. मोदी–शहा आणि भाजपच्या इतर नेत्यांपेक्षा सोधा पक्षाचाच या रॅलीवर वरचष्मा राहिला, त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली असून काही जणांनी नाराजीही व्यक्त केली. पक्षाच्या वरिष्ठांसह स्थानिक निष्ठावंतांना या रॅलीत कोणते स्थान होते? हा प्रश्नच असून भविष्यातील निवडणुकांमध्ये भाजपच्या निष्ठावंतांची आणखी कोंडी होईल, असे भाकीतही त्यांनी वर्तवले.

महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या वतीने भिंगार मध्ये प्रचारफेरी काढण्यात आली. यावेळी महेश नामदे, शहर जिल्हाध्यक्ष अॅड. अभय आगरकर, वसंत लोढा, विधानसभा प्रमुख महेंद्र गंधे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले, जिल्हा संपर्कप्रमुख सचिन जाधव, जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, शहराध्यक्ष दिलीप सातपुते, भाजप मंडल अध्यक्ष शाम बोळे, उपाध्यक्ष संजय पांढरे, भिंगार शहर शिवसेना प्रमुख सुनील लालबोंद्र, भिंगार राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष शिवम भंडारी, सरचिटणीस प्रशांत मुथा, रवींद्र बाकलिवाल, पंडित वाघमारे, प्रकाश रासकर, सोनू गोहेर, अनिल सबलोक, प्रकाश लुणीया, माजी नगरसेवक रवींद्र लालबोंद्रे, शुभांगी साठे, संजय छजलानी, प्रदीप परदेशी, राहुल जामगावकर, महेश झोडगे, दामोदर माखिजा, मयूर बोचुघोळ, महिला जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे, प्रजोत लूनिया कालिंदी केसकर सविता कोटा, कुसुम शेलार, रवि फल्ले, निलेश साठे, अनिरुद्ध देशमुख, चेतन वजगडेकर, गणेश साठे, राजेंद्र फुलारे, तुषार पोटे, बाळासाहेब भुजबळ, लक्षिकांत तिवारी, अनंत रासने, बंटी डापसे, बाळकृष्ण झांबरे, प्रदीप नामदे, रुपेश फल्ले, संग्राम म्हस्के, बाळासाहेब खताडे, संतोष हजारे, प्रशांत डावरे आदी

नातवाला न्याय मिळवून देण्यासाठी आजीचे उपोषण सुरू

नगर – २०२२ आणि २३ मध्ये झालेल्या पोलीस भरती होती. अहमदनगर येथे भरती झालेल्या उमेदवाराला मेडिकल फिटनेससाठी जे जे हॉस्पिटल येथे पाठवत नसल्याने तसेच सरकारी कर्मचारी व डॉक्टर यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने नातवाला न्याय मिळवून देण्यासाठी सुलोचना गणपत केदारे त्यांच्या नातवासह जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या बाहेर आमरण उपोषणास बसलेले आहेत.

सुलोचना केदारे यांचा मोठा नातू गणेश केदारे याने पोलीस अधीक्षक अहमदनगर येथील अस्थापना विभागातील कर्मचारी व त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल २०२१ पासून आवाज उठवल्याचा राग मनात धरून जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी यांच्याशी संगनमताने मेडिकल फिटनेस साठी जे जे हॉस्पिटल येथे पाठवण्यात आले होते.

सरकारी कर्मचारी व डॉक्टर यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई होत नसल्याने उपोषण आणखी तीव्र करण्याचा इशारा सुलोचना केदारे व त्यांचा नातू यांनी दिला आहे.

नातवाला न्याय मिळवून देण्यासाठी आजी सुलोचना केदारे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. याप्रसंगी नातू गणेश केदारे आदी.

शशिकांत रसाळ यांचे निधन

नगर– वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्णवेळ कार्यकर्ते व हिंद सेवा मंडळाचे माजी शिक्षक शशिकांत गणेश रसाळ (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे भावजय श्रीमती ज्योत्स्ना रसाळ, १ पुतणा व ३ पुतण्या असा परिवार आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या उपाध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली होती. अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे ते ४० वर्षे संचालक होते. ज्येष्ठ पत्रकार शिल्पा रसाळ व अमेय कॉस्मेटिक्सचे संचालक निखील रसाळ यांचे ते काका होते.

अशोक बोज्ञा यांचे निधन

नगर – पंचपीर चावडी येथील रहिवासी अशोक मल्लाय्या बोज्ञा (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांना तीन मुले या पैकी एक मुलगा मयत, सुना, नातवंड असा परिवार आहे. अशोक बोज्ञा हे पदमशाली समाजातील कारभारी म्हणून अनेक वर्षे काम केले असून ते नगर ते आळंदी मार्कंडेय महामुनी पायी दिंडी सोहळ्याचे संस्थापक होते. आजही हा दिंडी सोहळा चालू आहे. ते अत्यंत धार्मिक होते.

आदर्श लोकप्रतिनिधी, खासदार सुजय विखे यांना दिल्लीला पाठवायचे आहे

माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचे प्रतिपादन

नगर – मागील पाच वर्षात लोकसभा मतदार संघाता चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न खूप महत्वपूर्ण ठरल्याचे गौरवोद्‌गार माजीमंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या निवडणूक प्रचारार्थ बाबळे वाडी, वरशिंदे, ताहाराबाद, गाढकवाडी, म्हैसगाव, कोळेवाडी, शेरीचिखलठाण, दरडगावथडी या गावांमध्ये मतदारांच्या भेटी घेतल्या. निवडणुकीतील आपली भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने मागील १० वर्षात घेतलेल्या निर्णयांची माहिती देऊन या वेळेस पुन्हा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन महायुतीच्या नेत्यांनी केले आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या जोरावर नगरकरांच्या मनात आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांना जिल्ह्याच्या प्रश्नांची जाण आहे. जिल्ह्यातील तरुणांच्या रोजगारासाठी नगर तालुका तसेच श्रीगोंदा येथे औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत. यामुळे येणाऱ्या उद्योगांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असा विश्वास माजीमंत्री कर्डिले यांनी व्यक्त केला. अहिल्यानगर मतदारसंघांतील जनतेने डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. विखे पाटील यांच्या विजयामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान होण्याचा मार्ग अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करून या विभागाच्या विकासासाठी पुन्हा एकदा महायुतीला विजयी करा, असे आवाहन माजी मंत्री कर्डिले यांनी केले.

सुजय विखे यांच्या प्रचारानिमित्त आयोजित सभेत बोलताना माजीमंत्री शिवाजीराव कर्डिले.

लोकांनी ठरवावे भविष्यात कसा विकास हवा आहे : डॉ. सुजय विखे पाटील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली काम करताना गेल्या ५ वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. या ५ वर्षात लोकांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा प्रयत्न केला आणि गेल्या ५ वर्षांचे प्रगतीपुस्तक आज जनतेसमोर ठेवण्याचे काम करतोय, असे यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. तसेच आता लोकांनी ठरवायचे आहे, की भविष्यात आणखी कशा पद्धतीने विकास हवा आहे.यावेळी गेल्या ५ वर्षात लोकसभेत केलेल्या कामांचे जनतेसमोर सादरीकरण करत कामांची माहितीही डॉ. विखे यांनी दिली. जिल्ह्यात सर्वाधिक विकास कामे महायुतीच्या काळात झाल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याला सर्वाधिक निधी मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. येणाऱ्या काळात जिल्ह्यातील तरूणांना कामासाठी बाहेर जावे लागणार नाही, यासाठी आपले विशेष प्रयत्न असतील. त्यासाठी तीन एमआयडीसीची कामे तयार असून, लवकरच त्या सुरू केल्या जातील. त्याचबरोबर शेतकऱ्यासाठी बियाणांपासून बाजारपेठेपर्यंत सेवा, सुविधा निर्माण करण्याचा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. पंतप्रधान मोदींच्या हमीच्या जोरावर जिल्हा 'सुजलाम सुफलाम' करणार, असे त्यांनी बोलताना सांगितले.

गृहिणी

आरोग्य

पावसाळ्यात हे करा वर्ज्य

पावसाळ्यात पचनशक्ती मंदावते. त्यामुळे तेलकट, तळकट पदार्थ खाऊ नयेत. पावसाळ्यात भात खाल्ल्याने अंगावर सूज येण्यासोबतच पोट फुगते. त्यामुळे भात प्रमाणात खावा. मिठामुळे पोट फुगते आणि भूक जास्त लागते. त्यामुळे या दिवसामध्ये मीठही कमीच खावे.

पचनास जड असणाऱ्या फ्लॉवर, कोबीसारख्या भाज्या खाऊ नयेत. दह्यामुळे कफ होतो. शीतपेयांमध्ये शरीरातल्या खनिजांचे प्रमाण कमी होऊन पचनक्रियेवर परिणाम होतो.

पाककला

तोंडली चना भाजी

साहित्य – २५० ग्रॅम तोंडली, १ कप काबुली चने रात्रभर पाण्यात भिजवून नंतर उकडलेले, अर्धा कप नारळाचा खव, २ लाल मिरच्या, अर्धा लहान चमचा धने, अर्धा लहान चमचा जिरे, अर्धा लहान चमचा मोहरी, अर्धा लहान चमचा हळद, चिमूटभर हिंग, ५-६ कढीपत्ते, १ लहान चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

कृति – तोंडल्यांचे उभे चार तुकडे करून घ्या आणि बिगर पाण्याच्या वाफेवर शिजवून घ्या. लाल मिरच्या, धने व जिरे मिसळून मिक्सरमध्ये वाटून घ्या. नंतर नारळाचा खव टाकून फिरवा. पाणी घालू नका. कढईत तेल तापवून हिंग, जिरे, मोहरीची फोडणी द्या. नंतर तोंडली, काबुली चने, मीठ व हळद टाका. मंद आचेवर ३ मिनिटे परता. नंतर लिंबाचा रस टाका. चपाती, भाकरी व भातासोबत ही सुकी भाजी सर्व्ह करा.

वास्तू

घरासाठी

जर एखाद्या घरात आपले बरे न बघवणारी व घराच्या सुख, शांती, ऐश्वर्य यांना अपशकून करणारी, दृष्ट लावणारी माणसे येत असतील, तर यावर उपाय म्हणून आपल्या घराच्या मेन गेट वा मुख्य दाराच्या जवळपासच्या घराच्या आतील भागात थोडे थोडे खडे मीठ रोपाच्या आड लपवून ठेवले तर बाहेरच्यांची दृष्ट घराला लागणार नाही.

सौंदर्य

मुलतानी माती रात्रभर भिजत ठेवावी. सकाळी त्यात मोहरीचे तेल मिसळून केसांना लावावी व थोड्या वेळानंतर धुवावी.

सल्ला

गोटा खोबरे खराब होऊ नये म्हणून ते फोडून साखरेच्या डब्यात ठेवावे. मऊ व चांगले राहाते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, विशाखा २६।२४

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य–

मेष : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण मानसशास्त्रीय अंतर्दृष्टी घेऊन येईल. विरोधक करार करतील. काळजीपूर्वक काम करा.

वृषभ : आपला एखादा मित्र आपल्या विचारांबद्दल महत्वपूर्ण सल्ला देऊ शकतो. एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून पाहा. व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल.

मिथुन : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या आणि जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्या. आरोग्य नरम-गरम राहील. पाठबळ मिळेल

कर्क : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

सिंह : आज रात्री विश्रांती घ्या. रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका.

कन्या : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो. रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ. वेळ मनोरंजनात व्यतीत होईल.

तूळ : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

वृश्चिक : ठरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा. वडीलोपार्जित मालमत्तेत वाटा मिळेल. वाहने काळजीपूर्वक चालवा. शत्रूंपासून सावध राहा.

धनु : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

मकर : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल. मुलांवर खर्च होईल. मित्रांच्या सहयोगाने कार्यांमध्ये सहजपणा राहील.

कुंभ : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल.

मीन : पत्नी व मुले यांच्या सहवासामुळे मानसिक शांतता लाभेल. आपले इप्सित साध्य होण्याचे योग येतील. वस्तू व पैसे जपून वापरावेत. चोरी होण्याची शक्यता आहे. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा. अत्यंत व्यस्त राहाल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९१०

सौ. शैलजा कुलकर्णी

१	२	३	■	४	५		६
७			■	८		■	
९			१०	■	११		■
१२		■	१३	१४		■	१५
■	■	१६	■		■	१७	
■	■	१८	१९		२०	■	
२१	२२			■	२३	२४	
२५			■	२६			■

आडवे शब्द :- १) असंख्य; अगणित; अनंत ४) पूजा; आराधना ७) नजीक; समीप ८) गळ्याची मागची बाजू; आदर ९) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना ११) घन; निबिड; गर्द १२) कामदेवाची पत्नी १३) धुणे; पाण्याचे स्वच्छ करणे १७) तस्कर; चोरी करणारा १८) मराठी कॉम्प्युटर २१) पंज्याचा सांधा; मणिबंध २३) पारधी; शिकार करणारा २५) साह्य; साहाय्य २६) पटांगण; खेळासाठी वगैरे असलेली मोठी जागा

शब्दगंध क्र. ६९०९ चे उत्तर

अ	ने	क	■	का	ल	व	ड
■	पा	■	अ	ना	व	श्य	क
बे	ळ	गा	व	■	क	■	व
री	■	न	द	■	र	म	ण
ज	प	■	सा	ल	■	हि	■
■	र	थ	■	य	ज	मा	न
दि	वा	क	र	■	स्त	■	क
■	ना	वा	ज	णी	■	क	टी

उभे शब्द :- १) एक मोठा साप २) पश्चिम दिशा ३) तांबडी फुले येणारा एक वृक्ष ४) शंकराची पत्नी; पार्वती ५) विड्याची पाने वगैरे ठेवण्याचा डबा ५) विड्याचा ६) अपशकुन १०) राख; राखी; रखवाली १४) उग्र वासाचा एक कंद १५) भाजीपाला (हिंदी) १६) सुसंगत नसलेले १९) चमू; ग्रुप; समूह; ब्लॉक २०) कपड्यांवर वगैरे केलेली कलाकुसर २१) माझा, माझी; माझे २२) मोठी नदी

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : जीवनाचे नंदनवन करण्याचा एकच मार्ग आहे; तो म्हणजे परिश्रम. – **सुविचार संग्रह.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

लहान मुलांना गुदद्वाराच्या जागी खाज का येते?

खूप वेळा लहान मुले संडासच्या जागी (गुदद्वाराजवळ) खाजवताना दिसतात. विशेषतः संध्याकाळ व रात्रीच्या वेळी ही बाब प्रकर्षाने जाणवते. खाज येण्याच्या अनेक कारणांत खरूज, त्वचादाह, ॲलर्जी इत्यादींचा समावेश होत असला; तरी अशी खाज फक्त गुदद्वाराजवळ न येता शरीरात अनेक ठिकाणी येते.

तंतूकृमी किंवा एन्टेरोबियस व्हर्मीक्यूलॅरिस नावाच्या जंताची लागण झाली की, या जागेवर खाज येणे हे लक्षण दिसून येते. सोबतच चिडचिड करणे, झोप न येणे, अंथरुणात नकळत लघवी होणे ही लक्षणेही दिसून येतात. वारंवार खाजवल्यामुळे रक्त येते, जंतुसंसर्ग होऊन कधी कधी पू सुद्धा येतो. भारतात अनेक जणांना हा रोग असतो. या जंताची मादी एक सेंमी लांब असते. नर मात्र ०.३ सेंमी इतका लांब असतो. हे जंत पचनसंस्थेतील लहान आतडे, आंत्रपुच्छ, मोठे आतडे यांच्या आवरणाला चिकटून असे राहतात. फलन झाल्यावर रात्रीच्या वेळेस मादी गुदद्वाराबाहेर येऊन सुमारे १०,००० अंडी घालते व मरण पावते. स्त्रियांमध्ये क्वचित ही जंताची मादी गुदद्वारातून बाहेर येऊन योनीमार्गात जाते व गर्भाशयातून पोटाच्या आतील आवरणात जाऊ शकते.

मादीच्या गुदद्वाराबाहेर येण्यामुळे, अंडी घालण्यामुळे गुदद्वारापाशी खाज येते. ही अंडी अस्वच्छपणामुळे व खाजवल्यामुळे नखाच्या घाणीतून परत तोंडात जातात. लहान आतड्यात गेल्यानंतर त्यातून अळी बाहेर येते. महिन्याभरात त्याचे प्रौढ जंत तयार होऊन पुन्हा हे चक्र सुरू राहते. या जंतांसाठी पिरँटील पामोअेट वा मेबेंडॅझोल हे औषध प्रभावी ठरते. वैयक्तिक स्वच्छता नीट राखल्यास या जंताची लागण होणार नाही. नखे कापणे, शौचाला जाऊन आल्यानंतर तसेच जेवणापूर्वी हात साबण लावून पाण्याने स्वच्छ धुणे, एकमेकांचे कपडे न घालणे; या सोप्या गोष्टींमुळे या जंतांची लागण आपल्याला टाळता येते.

अडाणी माणूस

एक गरीब आणि अडाणी माणूस शहराबाहेर असलेल्या झोपडीत भाडे भरून राहत होता. झोपडीसमोर रिकाम्या जागी त्याने काही भाजीपाला लावल्या होता. शेजारीच एका बिळात एक ससा राहत होता. तो दररोज त्या भाजीच्या वाफ्यात येऊन त्यातील भाज्या फस्त करीत असे. त्याच्या त्रासाला वैतागून तो माणूस शहरात असलेल्या मालकाकडे जाऊन म्हणाला,

''मालक, मी झोपडीसमोरच्या जागेत काही भाजीपाला, फळझाडे लावली आहेत. शेजारचा ससा सारखा तेथे येऊन भाजीपाला, फळझाडे खाऊन जातो. त्यावर दगड फेकले, धावून गेले, त्याला भीती दाखवली तरी तो कशालाच जुमानीत नाही. तेव्हा आपण त्याचा बंदोबस्त केला तर बरे होईल. तेव्हा आपण उद्या तेथे येऊन त्या सशाचा बंदोबस्त करू, असे त्या माणसाला सांगून परत पाठविले. दुसऱ्या दिवशी मालक घोड्यावर बसून बरोबर काही मित्र, कुत्रे असा लवाजमा घेऊन तेथे आला. मग मालक व बरोबर आलेले त्याचे घोडेस्वार मित्र त्या माणसाला म्हणाले, सशाच्या बिळाजवळ जाऊन जोरजोराने शिंग वाजव म्हणजे ससा बाहेर पडताच आम्ही त्याचा समाचार घेऊ. यावर तो माणूस जोरजोराने शिंग वाजवू लागला. कुत्री भुंकू लागली. आवाजाने बिळातील ससा घाबरला आणि बाहेर पडून भाजी व फळझाडांच्या वाफ्यातून सैरावैरा धावू लागला.

ससा पाहताच कुत्रीही त्याच्या पाठी लागली. मालक आणि त्याचे घोडेस्वार मित्रही सशापाठी धावू लागले. ससा सर्व भाजीपाल्यात पळत आसरा शोधू लागला. थोड्याच वेळात ससा तेथून निसटून जाण्यात यशस्वी झाला. बराच वेळ झाला. काही हालाचाल दिसली नाही. तेव्हा सर्वांना कळून चुकले ससा दुसरीकडे पळून गेला आहे.

मग त्या माणसाचे लक्ष भाजी आणि फळझाडांच्या पिकाकडे गेले असता त्याचा झालेला विध्वंस पाहून त्याने कपाळाला हात लावला. घोडेस्वार आणि कुत्र्यांनी सर्व पिकात नाचून सर्व मळा उजाड करून टाकला होता.

तात्पर्य– कधी कधी रोग परवडला पण औषध नको असे म्हणण्याची पाळी येते.

जीवन चक्र

कि हम अपने आपको सही रूप में जानें, अपने आपको पहिचानें। इसका क्या मतलब हुआ? अपने आप को तो हर कोई शीशे में देखता है और पहचानता है। हर एक की शक्ल दूसरे से भिन्न है। यहाँ पर वे बाहरी रूप से अपने आपको पहिचानने की बात नहीं कर रहे हैं। महापुरुष हमें बार-बार समझाते हैं कि हमारा असली रूप आत्मिक है, इसी रूप को हमने जानना है, पहचानना है और उस रूप को हम तभी पहचान सकते हैं, जब हमें यक़ीन हो जाए कि दुनिया में हर चीज़, हर कार्य प्रभु के हुक्म से हो रहा है। यही बात यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

कीता लोड़हि सो प्रभ होई।।
तुझ बिनु दूजा नाही कोइ।।

वे हमें समझा रहे हैं कि जो कुछ भी हो चुका है, जो कुछ भी हो रहा है और जो आगे होगा, सब परमात्मा की इच्छा से हो रहा है, उसके भाणे में हो रहा है, उसकी रज़ा से हो रहा है, उसकी मर्जी से हो रहा है, उसके हुक्म से हो रहा है, उसकी अपनी मौज में हो रहा है। हर एक कार्य के पीछे कोई तो वजह है, जो हमारी समझ में नहीं आती। हमें लगता है, ये कार्य ऐसे ही हो गए। लेकिन यहाँ पर गुरु साहब हमें समझा रहे हैं कि सृष्टि में जो कुछ आज तक हुआ है, जो हो रहा है और जो आगे होगा, वह सब परमात्मा की मर्जी से हो रहा है, उसके भाणे में हो रहा है, उसके हुक्म से हो रहा है। उसके हुक्म के मुताबिक हमें अपनी जिंदगी को ढालना है, जैसा कि गुरुवाणी में आया है :

तेरा भाणा मीठा लागे।

हमें अपनी जिंदगी ऐसे जीनी है कि हम हर हालत में प्रभु का शुक्राना अदा करें। उसी ने हमें जिंदगी दी है। हम बहुत खुशकिस्मत हैं कि प्रभु ने दया-मेहर करके हमें यह मानव चोला बख़्शा। ८४ लाख जियाजून में सबसे उत्तम, सबसे अव्वल यह नर-नारायणी देह है और यह बड़े भाग्यों से मिलती है, जब प्रभु की ख़ास दया-मेहर हो।

अगर हम इन्द्रियों के वश में ही रहे, तो फिर अपने आपको जान नहीं सकेंगे। इन्द्रियाँ मन को बाहरी भोगों में खींच रही हैं और चूंकि आत्मा मन के साथ बंधी पड़ी है, उसका ध्यान बाहरी दुनिया में भटक रहा है। अगर आप दो पल के लिए सोचें, तो पायेंगे कि हमारे सारे कार्य बाहर की दुनिया के लिए होते हैं। बच्चों का पालन पोषण करना हो, दफ़्तर का काम करना हो, घर का काम करना हो, पढ़ाई-लिखाई करनी हो, सुबह से शाम तक हम दुनिया के कार्यों में व्यस्त रहते हैं। यह मौका, जो हमें मिला है, अपने आपको जानने का, हमारे हाथ से निकला जा रहा है।

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

जहाँ बीज बुवाई करनी है वहाँ गोबर की खाद अथवा केंचवे की खाद, नीम का पाउडर जमीन में अवश्य मिलायें। २. पौधे लगाते समय २ ली. बीजामृत में ५० ग्राम ट्रायकोडर्मा, २५० ग्राम ॲझोटोबॅक्टर और २५० ग्राम पी.एस.बी. जीवाणु संवर्धक मिलाकर पौधों की जड़ें आधा घण्टे तक डुबोकर रखें फिर पौधे लगायें। समय किसी का इंतज़ार नहीं करता, चाहे कोई राजा-महाराजा हो, अमीर हो, किसी देश का राष्ट्रपति हो। समय किसी के लिए नहीं रुकता। जो क्षण हमें मिले हैं इस शरीर में, आहिस्ता-आहिस्ता बीत रहे हैं। इन क्षणों का हमें पूरा फायदा उठाना है। इन कीमती क्षणों का पूरा फायदा तभी हो सकता है, जब हमारा ध्यान प्रभु की ओर हो। ध्यान उसी में होता है, जिसे हम पसंद करें। महापुरुष हमें यही समझाते हैं कि हमारी आत्मा परमात्मा से प्रेम करे। प्रभु इस हरि-मन्दिर में है, इस शरीर में है, कण-कण में बसा हुआ है और हमारी आत्मा परमात्मा की अंश है, इस शरीर को जान दे रही है, वह भी शरीर में बस रही है, दोनों का मिलाप होना है। यही जिंदगी का ध्येय है।

परम संत कृपालसिंह जी महाराज फ़रमाया करते थे कि हमारी हालत ऐसी है, जैसे कि एक ही घर में पति-पत्नी रहते हैं, लेकिन आपस में बात नहीं करते। आत्मा और परमात्मा इस शरीर में रहते हुए भी अलग हैं। प्रभु हमसे मिलने के लिए बेताब हैं, लेकिन हमारा ध्यान दूसरी ओर है, हम माया के जाल में फंसे हुए हैं। गुरु अर्जनदेव जी महाराज हमें समझा रहे हैं कि परमात्मा हमारी आत्मा के अंग-संग है। हमारी आत्मा का रिश्ता परमात्मा से ऐसा है, जैसे मछली और पानी का। मछली जल में रहती है, जल ही उसका जीवन आधार है। जल के बिना मछली जीवित नहीं रह सकती। परमात्मा हमारी रग-रग में समाया हुआ है। आत्मा परमात्मा की अंश है और इस शरीर को शक्ति दे रही है। जब आत्मा शरीर छोड़ देती है, तो शरीर बेजान हो जाता है। अगर हमारी जिंदगी शरीर को साफ़ रखने में ही गुज़र गई, तन्दुरुस्त रखने में ही चली गई, तो जिंदगी जीने का कोई फायदा नहीं है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

गण्याने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली
गण्या – साहेब मला फोनवर धमक्या मिळत आहेत
पोलीस – कोण आहे तो जो तुम्हाला धमक्या देत आहे?
गण्या – एम.एस.ई.बी.वाले म्हणतात...
बिल नाही भरल तर कापून टाकीन

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

कमळाच्या पानावर पडणारा
तू दवाचा टपोरा थेंब आहेस
पानाच्या वरील भागात पडणारा
मी एक छोटासा थेंब आहे
असे तो तलावास म्हणाला

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

पाळीपूर्व त्रासदायक लक्षणे –

काही स्त्रियांमध्ये मासिक पाळी सुरू होण्याआधी आठ ते दहा दिवस त्रासदायक लक्षणे दिसून येतात. यालाच आधुनिक भाषेत प्रीमेनस्टुअल सिन्ड्रोम (Premenstrual Syndrome - PMS) असे म्हणतात. चिडचिड, अस्वस्थपणा, कामामध्ये लक्ष न लागणे, शरीर जड वाटणे, स्तनांमध्ये जडपणा, अंगावर सूज, आळस, नेहमीच्या वजनापेक्षा १ ते २ किलो वजन वाढणे, वारंवार लघवीला जावेसे वाटणे, मलावस्तंभ, पोट दुखणे, कधी कधी उलट्या होणे, चक्कर, बारीकसा ताप, हताश होणे, रडायला येणे, सर्वांगामध्ये दाह, झोप न लागणे अशी विविध प्रकारची लक्षणे स्त्रियांमध्ये आढळून येतात. ही त्रासदायक लक्षणे निर्माण झाल्यावर दैनंदिन जीवनातील कामे करणे अवघड होते.

काही स्त्रियांमध्ये अर्धशिशीचा (मायग्रेन) त्रास जाणवतो. यामध्ये डोके भयंकर दुखते. त्यासोबत चक्कर येणे, उलट्या होणे, डोळ्यांपुढे अंधारी येणे ही लक्षणे तीव्र स्वरूपात दिसतात. अशा वेळी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होऊन उपचार घ्यावे लागतात. यामध्ये सलाईनदारे वेदनाशामक क्षार घ्यावे लागतात. यामध्ये सलाईनद्वारे वेदनाशामक, उलटी व मळमळीची भावना कमी होणारी इंजेक्शन दिली जातात. या स्त्रियांच्या त्रासदायक लक्षणांचा विचार करता हा आजार गंभीर स्वरूपाचा असेल असे वाटते. परंतु या स्त्रियांची रक्त, लघवी तपासणी केल्यानंतर रिपोर्ट्स सहसा नॉर्मल येतात. पाळी आल्यानंतर दोन ते तीन दिवसांत ही लक्षणे एकदम कमी होतात व मधले १८ ते २० दिवस चांगले गेले, की परत त्रास सुरू होतो.

ज्या स्त्रिया अति मानसिक ताण घेतात, सतत चिंता करतात अशांमध्ये हा आजार आढळून येतो. परंतु याचा अर्थ ती स्त्री आजाराचे नाटक करते असा नाही. खरोखरच तिला या आजाराचा भयंकर त्रास होतो.

'प्रोजेस्टेरॉन'चे प्रमाण मासिक पाळीच्या आधी वाढलेले असते. त्यामुळे प्रीमेनस्टुअल लक्षणे निर्माण होतात. अगदी शालेय मुलींपासून ते ४५ वर्षापर्यंतच्या स्त्रियांमध्ये ही लक्षणे दिसून येतात. वाढती स्पर्धा, मानसिक ताण, सतत होणारे खच्चीकरण, नकारात्मक विचारसरणी, यांमुळे ही लक्षणे निर्माण होतात. शरीरामध्ये व मनामध्ये भावनांचा उद्रेक निर्माण होतो. या काळात प्रोजेस्टेरॉन हार्मोन्समुळे स्त्रीच्या शरीरात मीठ व पाण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे या ६ आजाराचा त्रास जास्त जाणवतो.

डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

केडगाव भगवान महावीर जन्मकल्याणकची रंगलेल्या शोभायात्रेत सहभागी झालेले जैन बांधव. दुसऱ्या छायाचित्रात केसरी,लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी. तिसऱ्या छायाचित्रात विद्यार्थ्यांच्या कवयातीने उपस्थितांची मने जिंकली.

केडगावमध्ये भगवान महावीर जन्मकल्याणकची रंगली शोभायात्रा

जे.एस.एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचा लेझीम पथकाने वेधले लक्ष

नगर – अहिंसा परमो धर्म:ची शिकवण देऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा उपदेश करणारे भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक (जयंती) केडगावमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेव युवा मंचच्या वतीने केडगाव परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत जे.एस.एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.

शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथकासह डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले-मुली, पांढरे वस्त्र परिधान केलेले पुरुष, केसरी, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. या शोभायात्रेचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. यात्रेच्या अग्रभागी भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले रथ होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विविध डाव सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की... अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

भूषणनगर ताराबाग कॉलनी येथून शोभायात्रेचे प्रारंभ झाले. नगर-पुणे रोड मार्गे केडगाव बस स्थानक, अंबिका बस स्थानक येथून मार्गक्रमण होऊन पाच गोडाऊन जवळील केडगाव जैन धर्मस्थानक येथे शोभा यात्रेचा समारोप झाला. यावेळी साध्वी नवीन ज्योतीजी म.सा. यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास सचिन (आबा) कोतकर यांनी भेट देवून सर्व भाविकांना भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व केडगाव जैन धर्मस्थानक परिसरात संदिप उद्योग समुहाच्या माध्यमातून पेव्हिंग ब्लॉग बसवून सुशोभिकरण करण्याचे आश्वासन दिले. मुलांनी नाटिकेतून भगवान महावीर यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी दिलेली शिकवण सांगितली. महिलांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी उपस्थितांनी आपले विचार मांडले. भाविकांसाठी गौतम प्रसादीचे नियोजन करण्यात आले होते.

महावीर जन्मकल्याणक दिनानिमित्त देवगाव येथे 'शिस्तबद्ध मिरवणूक'

नेवासा – तालुक्यातील देवगाव येथे सामुहिक भगवान महावीर जन्म कल्याणक दिवस निमित्त मिरवणुक काढण्यात आली. तसेच दिक्षार्थी ममुक्षबेन प्रतिक्षा भंडारी यांचेही वरघोडा काढण्यात आली. जैन स्थानक ते कार्यक्रम स्थळपर्यंत शिस्तबद्ध निघालेल्या मिरवणुकीत जैन बांधव व भगिनी सहभागी झाल्या होत्या. जैन स्थानकात मधुरव्यख्यानी सम्यकदर्शनाजी म. सा., रत्नदर्शनाजी म. सा., तेजसदर्शनाजी म. सा. यांच्या उपस्थित विधीवत पुजनासह धार्मिक कार्यक्रम पार पडले.

यावेळी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, विठ्ठलराव लंघे, सौ. सुनितताई गडाख, माजी आ. पांडुरंग अभंग, देवागाव येथील सरपंच, उपसरपंच, चेअरमन हजर होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी, नेवासा तालुका जैन महासंघाचे सर्व पदाधिकारी देवगांव जैन श्रावक संघाचे पदाधिकारी व समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

देवगाव येथे सामुहिक भगवान महावीर जन्मकल्याणक दिनी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सहभागी झालेले जैन बांधव व भगिनी. समवेत मधुरव्याख्याती रत्नप्रभाजी म.सा., तेजसदर्शनाजी म.सा.आदी.

नॉर्थस्टार ग्लोबल स्कुलमध्ये सैनिक प्रशिक्षण देणारे मानसिंग पाटील व मीरा पाटील. समवेत संचालिका छायाताई खर्डे, प्राचार्य पंकज मालेगावकर व विद्यार्थी.

नॉर्थस्टार ग्लोबल स्कूलमध्ये सैनिक प्रशिक्षणावर भर

मानसिंग पाटील व मीरा पाटील यांनी घेतले स्कूलचे दायित्व

नगर-महाराष्ट्र इन्स्टिट्युट एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट पुणे संचलित असणाऱ्या नॉर्थस्टार ग्लोबल अ‍ॅकॅडमी अँड न्यू होरायझन ज्युनिअर कॉलेजमध्ये नव्याने रुजू झालेल्या मानसिंग पाटील (Ex-Indian Air Force Education Officer) व मीरा पाटील (Icon in Child Education) यांनी स्कूलला उत्तुंग यशाकडे कडे घेऊन जाण्याचा संकल्प केला आहे. या दोन्ही व्यक्तीना शैक्षणिक क्षेत्रातील ४७ वर्षेचा अनुभव आहे. स्कूलच्या वतीने संचालिका छायाताई खर्डे यांनी मीरा पाटील व स्कूलचे प्राचार्य पंकज मालेगावकर यांनी मानसिंग पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

आपल्या स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह त्यांचा बौद्धिक मानसिक भावनिक विकासावरही देखील आपला आपले स्कूल भर देणार असल्याचे मत मानसिंग पाटील यांनी व्यक्त केले. आपल्या स्कूलमध्ये JEE आणि NEET सह सैनिकी प्रशिक्षणावर विशेष भर दिला जाणार असल्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. आपल्या स्कूल मधून राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील .

शैक्षणिक वाटचालीमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान असून त्यावरच आयुष्याची इमारत उभी राहत असल्याचे मत मीरा पाटील यांनी व्यक्त केले सर्वांना सोबत घेऊन शैक्षणिक प्रगती साधण्यावर भर देण्याचा माझा विचार असून सर्वांना सोबत घेऊनच ही प्रगती साधणार आहे. आपण सर्वजण या स्कूलचा घटक असल्यामुळे या स्कूलच्या प्रगतीसाठी आपण सर्वजण कटीबद्ध आहोत. या स्कूलच्या उत्कर्षासाठी सर्वजण सर्वतोपरी प्रयत्न करतील.

रक्तदानातून दिलेला संदेश सामाजिक भावनेचा आदर

नानासाहेब जाधव

प्राचार्य सुनील पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नगर – रक्तदान ही काळाची गरज झाली असून, प्रत्येकाने रक्तदान करणे आवश्यक आहे. आपल्या एका रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. प्राचार्य सुनिल पंडित यांनी विविध संघटनेचे काम करत असतांना आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबीरसारखा स्त्युत्य उपक्रम राबविला आहे. शिबीरात शिक्षकांनी केलेल्या रक्तदानामुळे कृतीतून दिलेला संदेश समाजिक भावनेचा आदर ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी केले.

वाढदिवसाच्या अवचित साधून सुनील पंडित मित्र मंडळाच्यावतीने दादा चौधरी विद्यालय कोर्ट गल्ली अहमदनगर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा.भानुदास बेरड, अ.भा. शैक्षणिक संघाचे प्रांताचे संघटन मंत्री दिलीप अहिरे, दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंतराव देसाई, राज्य शिक्षक परिषदेचे नाशिक विभागाचे अध्यक्ष शरदराव दळवी, विभाग कार्यवाह सचिन पाटील, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे सदस्य बाबासाहेब बोडके, कार्यवाह शिवाजीराव घाडगे, खजिनदार प्रसाद सामलेटी आदि उपस्थित होते.

यावेळी दिलीप अहिरे म्हणाले, रक्तदान शिबिर आयोजित करून प्राचार्य सुनील पंडित मित्र मंडळ आणि शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणार्यांनी एक नवीन पायंडा पड आहे. उपक्रमात अखिल भारतीय स्तरापासून राज्यस्तरापर्यंत जिल्हा स्तरापर्यंत सर्व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभागी झाल्याने या उपक्रमाची व्याप्ती लक्षात येते. अशा प्रकारचे रक्तदान शिबिरे समाज उपयोगी अनेक प्रकारचे उपक्रम राबवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

यावेळी प्रा. भानुदास बेरड यांनी प्राचार्य पंडित यांच्या कार्याचा आढावा घेत असताना पंडित सर हे तळागाळा मधून कोणतेही काम दिले असता पण ते संघटनेचे काम दिले असता ते प्रामाणिकपणे करत आहेत. त्याचमुळे ते अनेक संघटनांमध्ये काम करून सुद्धा त्या संघटना बळकट करण्याचे काम त्यांनी मनापासून केले. रक्तदान शिबिराच्या आयोजन करून चार ते पाच वर्षापासून अतिशय स्तुत्य असा उपक्रम सुरू केला असल्याचे सांगितले.

यावेळी अनंत देसाई म्हणाले, हिंद सेवा मंडळामध्ये आज या निमित्ताने अनेक शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून रक्तदान शिबिरामध्ये सक्रिय सहभाग नोंदवल्याबद्दल सेवा मंडळाच्या वतीने त्यांनी सर्वांचे ऋण व्यक्त केले व भविष्यामध्ये अशा प्रकारचे चांगले स्तुत्य उपक्रम राबवण्याचे आवाहन केले.

यावेळी शिक्षण अधिकारी (योजना) बाळासाहेब घुगे, उपशिक्षण अधिकारी आकाश दरेकर, विस्तार अधिकारी श्री. शिंदे, विस्ताराधिकारी श्री. ढवळे, बाबासाहेब बोडके आदींनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शरद दळवी, प्रसाद सामलेटी, नंदा कानिटकर, नितीन केणे, दीपक आरडे, अजय महाजन, अशोक डोळसे, दीपक शिरसाठ, बबनराव शिंदे, जयश्री ताटी, नाना देव, विठ्ठल ढगे, चिन्मय पंडित, सखाराम गारुडकर आदींनी परिश्रम घेतले. रक्त संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तपेढीच्यावतीने करण्यात आले.

जिल्हा वाचनालय व रोटरी एम्पॉयरिंग युथच्यावतीने पुस्तक दिनी पुस्तके भेट

पुस्तक दिनानिमित्त जिल्हा वाचनालयात मुलांना बालसाहित्यिक पुस्तकाचे वाटप करण्यात आले. शिवाजी नाईकवाडी, अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, रोटरीच्या समन्वयक डॉ.बिंदू शिरसाठ, खजिनदार तन्वीर खान, संचालिका प्रा.मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, वाचक अविनाश रसाळ, संतोष जाधव आदि. (छाया – सुरेश मैड)

पुस्तकांच्या विश्वात मुले रमली

नगर – सोशल मिडियाच्या 'स्कोरलिंग' जगात बोटे मोबाईलवर सराईतपणे फिरणारी बोटे आज चक्क पुस्तकांच्या पानावरुन फिरत होती. औचित्य होते, जागतिक पुस्तक दिनानिमित्त अहमदनगर जिल्हा वाचनालय व रोटरी क्लब -२ ऑफ एम्पॉयरिंग युथच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे.

जिल्हा वाचनालयातच्यावतीने आयोजित या कार्यक्रमप्रसंगी लेखक विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून 'माणुसकीची शाळा' चळवळीचे प्रणेते शिवाजी नाईकवाडी, अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, रोटरीच्या समन्वयक डॉ.बिंदू शिरसाठ, खजिनदार तन्वीर खान, संचालिका प्रा.मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, वाचक अविनाश रसाळ, संतोष जाधव उपस्थित होते.

प्रास्तविकात प्रा.शिरिष मोडक यांनी बोलतांना वाचनालयाने वाचन संस्कृतीतून असंख्य पिढ्या घडविल्या आहेत. आज वाचन दिनी बालकांच्या हाती आलेली पुस्तके व संस्कार हा वारसा पुढे चालवतील असा आशावाद व्यक्त केला.

शिवाजी नाईकवाडी यांनी मुलांशी मनोरंजकपणे सुसंवाद साधतांना वाचन व संस्कार हे आयुष्याला कसे घडवितात, यावर भाष्य केले. यावेळी सुमारे १२० मुलांना विविधध विषयीवरचे बालसाहित्य भेट देण्यात आले.

विल्यम शेक्सपिअर यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन याप्रसंगी भरविण्यात आले. पुस्तकदिनाचा कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोटरी -२ क्लब एम्पॉयर क्लबच्या अध्यक्ष शिलु मक्कर, सचिव आरती म्हात्रे, सुशिला मोडक, जागृती ओबेरॉय, डॉ.बिंदू शिरसाठ, वाचनालयाचे कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले. आभार प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी मानले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार जालिंदर बोरुडे यांना जाहीर

नगर – फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना जनकल्याण फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

जालिंदर बोरुडे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३१ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्या असून, या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आणले आहे.

नेत्र शिबिराबरोबरच समाजाची गरज ओळखून विविध आरोग्य शिबिर फाऊंडेशनच्या माध्यमातून ते घेत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याची माहिती जनकल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे व सचिव सुरेश रोडगे यांनी दिली.

गोंडेगाव (ता. नेवासा) येथे मंगळवारी (३० एप्रिल) तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बोरुडे यांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

सच्चा सौदा – एक खरा सौदा

वयाच्या अठराव्या वर्षी गुरू नानक साहिब यांना त्यांचे वडील मेहता कालू यांनी व्यवसाय करण्यासाठी शहरात पाठवले होते. गुरू साहिबांचे मन शेती आणि इतर सांसारिक कामात नाही हे पाहून त्यांचे वडील निराश झाले, म्हणून त्यांना वाटले की, त्यांना व्यापारात गुंतवून ठेवल्यास एक चांगला फायदेशीर व्यवसाय होईल आणि दुसरे म्हणजे त्यांचा मुलगा दिवसभर आपल्या ग्राहकांशी त्याच्याविषयी बोलण्यात आनंदी राहील. असा विचार करून आणि एक शुभ दिवस निवडून मेहता कालू यांनी भाई मर्दाना जी यांना गुरु साहिब सोबत बोलावले.

मेहता काळू यांनी गुरु नानक आणि भाई मर्दाना यांना वीस रुपये दिले आणि म्हणाले, नानक यांच्यासोबत जा. काही खऱ्या वस्तू विकत घेऊन आणा ज्याची विक्री करून आम्हाला नफा होऊ शकेल. अशा प्रकारे तुम्ही फायदेशीर व्यवहार केल्यास, पुढच्या वेळी मी देईन. तुमच्याकडे वस्तू खरेदी करण्यासाठी अधिक पैसे आहेत.

गुरु नानक आणि भाई मर्दाना जी काही व्यापारी माल घेण्यासाठी तलवंडीहून चूहार- खानाकडे निघाले. ते गावापासून क्वचितच दहा-बारा मैलांवर गेले होते, जेव्हा ते एका गावात आले, जिथे लोक उपाशी, तहानलेले आणि पाण्याअभावी आजारी होते आणि रोगराई पसरत होते.

गुरु नानक साहिब जी भाई मर्दाना जी यांना म्हणाले, वडिलांनी आम्हाला काही फायदेशीर व्यवहार करण्यास सांगितले आहे. गरजूंना अन्न आणि कपडे घालण्यापेक्षा कोणताही सौदा खरोखर फायदेशीर असू शकत नाही. मी ही खरी सौदेबाजी सोडू शकत नाही. हे क्वचितच मिळते. यासारखे काही फायदेशीर व्यवहार करण्याची संधी.'

गुरु नानक हे सर्व पैसे जवळच्या गावातल्या घरात घेऊन गेले, जिथे त्यांनी भरपूर अन्नधान्य विकत घेतले आणि या लोकांसाठी पाणी आणले. गुरुसाहेबांनी वीस रुपये गुंतवले ज्याला आज आपण 'लंगर' म्हणतो.

ही सर्व घटना श्री गुरु ग्रंथ साहिबजी-मध्ये लिहिली आहे. (अंग – ५८७)

इसु भेखै थावहु गिरहो
भला जिथहु को वरसाइ ।।
या भिकाऱ्यांचे वस्त्र परिधान करण्यापेक्षा
गृहस्थ होऊन इतरांना देणे चांगले.
सबदि रते तिना सोझी
पई दूजै भरम भुलाइ ।।
जे शब्दाशी एकरूप होतात, त्यांना
समज प्राप्त होते;
इतर संशयाने भटकतात.
पइऐ किरति कमावणा
कहणा कछू न जाइ ।।

ते त्यांच्या भूतकाळातील कृतींनुसार कार्य करतात; त्यांच्याशी बोलणे व्यर्थ आहे.

नानक जो तिसु भावहि से भले जिन की पति पावहि थाइ ।।१।।

नानक, जे प्रभूला संतुष्ट करतात ते चांगले आहेत; तो त्यांचा सन्मान राखतो. ।।१।।

गावकऱ्यांसाठी अन्न आणि पाणी आणण्याबरोबरच, भाई मर्दाना जी आणि गुरु साहिब यांनी उरलेल्या पैशातून कपडे आणले. गावकऱ्यांकडून रजा घेऊन ते 'रिक्त हाताने' परतायला लागले.

जेव्हा दोघेही तलवंडीजवळ पोहोचले तेव्हा गुरु नानक मर्दानाजींना म्हणाले, 'तुम्ही एकटेच गावी जा, मी या विहिरीवर बसेन.' भाई मर्दानाजी गावात गेले आणि त्यांनी पिता मेहता कालू जी यांना संपूर्ण कथा सांगितली. जिथे गुरू नानक बसले होते. मेहता कालू यांना खूप राग आला की त्यांनी अन्न, कपडे आणि गरजू लोकांची काळजी घेण्यात पैसा वाया घालवला आणि काहीही फायदा झाला नाही. सर्व काम बाजूला ठेवून त्यांनी भाई मर्दानाजींना सोबत घेतले आणि विहिरीच्या दिशेने निघाले.

गुरु नानकांनी आपल्या वडिलांना आपल्यावर रागावू नका असे सांगितले. त्याने आपल्या वडिलांना सांगून समजवण्याचा प्रयत्न केला की आपण पैशात काहीही चुकीचे केले नाही परंतु खऱ्या अर्थाने 'सच्चा सौदा' (खरा सौदा) केला आहे.

लेखक- सनी वधवा,मो.९९६०६०५११५
उद्योजक, MIDC, **अहमदनगर**

जैन ओसवाल पतसंस्थेचे सभासद असल्याचा नेहमीच अभिमान....

सहकारी बँकिंग क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व सुवालालजी गुंदेचा यांनी दूरदृष्टीने स्थापन केलेल्या जैन ओसवाल पतसंस्थेने २३ वर्षांच्या वाटचालीत १०० कोटींच्या ठेवींचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. संस्थेच्या सर्व सभासदांसाठी ही अतिशय गौरवास्पद बाब आहे. विशेष म्हणजे मागील सात आठ महिन्यात तब्बल २२ कोटींच्या ठेवींची भर पडली आहे.

यासाठी विद्यमान चेअरमन संतोष गांधी, व्हाईस चेअरमन समीर बोरा व त्यांचे सहकारी संचालक तसेच सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी व सर्व कर्मचारी अभिनंदनास पात्र आहे. एकीकडे अनेक सहकारी आर्थिक संस्था विविध कारणांनी अडचणीत आल्या आहेत, ठेवीदार हक्काच्या पैशांसाठी झगडत आहे. अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा असा प्रश्न असताना सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने विश्वसनीयता आणि प्रामाणिकपणाला किती महत्व आहे हे आपल्या उत्कृष्ट कारभारातून दाखवून दिले आहे....

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा हे नगरमधील सहकारी बँकिंगमधील अभ्यासू व्यक्तीमत्व होते. आर्थिक संस्थेचे महत्व व त्याव्दारे समाजाची उन्नती कशी साध्य होवू शकते हे त्यांना चांगलेच ज्ञात होते. म्हणूनच त्यांनी जैन ओसवाल सहकारी नागरी पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. सर्वसामान्यांना पत देण्याचे काम त्यांनी केले. छोट्या व्यावसायिकांना मोठी झेप घेण्याची उमेद त्यांनी दिली. त्याचाच परिपाक म्हणून आज या संस्थेची झालेली प्रगती आहे. संस्थेत त्यांनी कायम विश्वस्त भावनेने काम केले व इतर सहकारी संचालकांनाही तशीच प्रेरणा दिली. शिस्तबध्द कारभाराची आदर्श घडी त्यांनी बसवली. आज विद्यमान संचालक मंडळात तरूण व अनुभवींचा योग्य ताळमेळ आहे. भाऊंच्या आदर्शानुसारच ते तळमळीने संस्थेचे हित जपणारा कारभार करीत आहेत. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे.

सर्वोत्कृष्ट बँकिंग सेवा, पारदर्शी कारभार आणि सर्वोत्तम व्यवस्थापन यासाठी पतसंस्था नावाजली जाते. विद्यमान संचालक मंडळ विश्वस्त भावनेने काम करीत आहे. ठेवी सातत्याने वाढत असून संस्था कर्ज वसुली प्रभावीपणे होईल यादृष्टीनेही विशेष प्रयत्न करीत आहे हे अतिशय चांगले लक्षण आहे. पतसंस्थेने नेहमीच नाविन्यपूर्ण योजना राबवून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे.

नुकतीच जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना ठेवींवर अतिरिक्त व्याज देणारी योजना राबविण्यात आली. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. याशिवाय सोनं खरेदीसाठी कर्ज ही अभिनव योजनाही ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे. पतसंस्थेकडून वेअर हाऊस कर्ज, सोने तारण कर्ज आदी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

याशिवाय विविध शासकीय कर भरणा, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, संगणकीकृत कामकाज, एस एम एस सेवा, क्यु आर कोड अशा अत्याधुनिक सुविधाही उपलब्ध आहेत. पतसंस्थेशी व्यवहार करणाऱ्या प्रत्येकाला आर्थिक सुबत्ता लाभावी, त्यांची स्वप्ने साकार व्हावी यासाठी पतसंस्थेने कायम चांगला कारभार करण्यावर भर दिला आहे. आताच्या तीव्र स्पर्धेच्या युगात पतसंस्थेने स्वतःला सिद्ध केले आहे. या संपूर्ण वाटचालीत स्थापनेपासूनचे आतापर्यंतचे सर्व आजी माजी संचालक, कर्मचारी, अधिकारी यांचा मोलाचा वाटा व योगदान आहे.

सभासदांना स्थापनेपासून कायम १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा संस्थेने कायम राखली आहे. संस्थेची स्वमालकीची सुसज्ज अशी भव्य इमारत पाहिल्यावर प्रत्येक सभासदाला मनोमन आनंद होतो. त्या वास्तूत गेल्यावर भाऊंची आठवण होते. एका अतिशय चांगल्या संस्थेचे आपण सभासद आहोत याचा अभिमान वाटतो. संस्थेने आता शाखाविस्तार करून आपल्या सर्वोत्कृष्ट कार्याचा लाभ जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करावा याच शुभेच्छा.

–सुरेश हरकचंद मुथा, सभासद

आरोग्य सेवेत बांधिलकीचा मापदंड निर्माण करणाऱ्या

सरस्वती हॉस्पिटलचा ७ वा वर्धापन दिन

अत्याधुनिक दर्जेदार रूग्णसेवेला आरोग्य चळवळ व आनंदी जीवनाची जोड

सरस्वती हॉस्पिटलचा ७ वा वर्धापन दिन साजरा करताना डॉ. अमोल जाधव व डॉ. प्राजक्ता जाधव. समवेत त्यांचे सहकारी डॉक्टर्स व स्टाफ आदी दिसत आहेत.

नगर – आई व बाळाची परिपूर्ण काळजी घेत आरोग्यसेवेत बांधिलकीचा नवा मापदंड निर्माण करणाऱ्या माळीवाडा येथील सरस्वती हॉस्पिटलचा ७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव व डॉ.प्राजक्ता जाधव यांनी या कालावधीत सामाजिक जाणीव ठेवून अत्याधुनिक रूग्णसेवा देण्याचा प्रयत्न केला. त्याला नगरसह जिल्ह्यातून रूग्णांचा प्रतिसाद मिळाला आहे. विश्वासार्हता, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीमुळे आरोग्य क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने ठसा उमटवला आहे. आरोग्य सेवेचा हा नंदादीप असाच तेवत राहील असा विश्वास यानिमित्त डॉ. जाधव यांनी व्यक्त केला आहे.

डॉ.जाधव यांनी सांगितले की, ७ वर्षांपूर्वी एक ध्येय समोर ठेवून सरस्वती हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवली होती. या काळात नेहमीच सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. मोठ्या महानगरांमध्ये मिळणाऱ्या आरोग्य सुविधा नगरमध्ये तुलनेने कमी दरात उपलब्ध करून दिल्या.

हॉस्पिटलच्या प्रवासात सुमारे ५ हजार डिलिव्हरी आणि १५ हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. ६०० पेक्षा अधिक आरोग्य शिबिरे घेतली आहेत. प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व योजनेंतर्गत अनेक महिलांच्या मोफत तपासणी केल्या. याशिवाय महिला सक्षमीकरणासाठी जोडी तुझी माझी, दिल ये जिद्दी है, पत्र लेखन, प्रेगनन्सी फॅशन शो, अहमदनगर फॅशन शो असे अनेक उपक्रम राबवून महिलांना निखळ आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

रूग्णांवर उपचार करण्याबरोबरच त्यांना आनंदी जीवनाचा मंत्र देण्याचा प्रयत्न असतो. रूग्णांना उच्च दर्जाच्या सेवेची हमी देणारे नॅशनल क्रेडीशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) या संस्थेचे मानांकन हॉस्पिटलला प्राप्त झाले आहे.

हॉस्पिटलमध्ये प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात तपासणी, वेदन विरहित प्रसूती, किशोरवयीन समुपदेशन, लग्नापूर्वी व गर्भधारणेपूर्वीचे समुपदेशन सल्ला केंद्र, अनियमित पाळी व पीसीओडी उपचार, मेनोपॉज मार्गदर्शन तसेच वंध्यत्व निवारण आदी उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

याशिवाय दुर्बिणीव्दारे शस्त्रक्रिया, टाका विरहीत पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया, शासनमान्य कुटुंब कल्याण व गर्भपात केंद्र, लैंगिक समस्या मार्गदर्शन, कर्करोग निदान व उपचार, सोनोग्राफी व कलर डॉपलर सेंटर, पॅथॉलॉजी लॅब, कॅशलेस सुविधा उपलब्ध आहेत.

अत्याधुनिक सोनोग्राफी मशिन सरस्वती हॉस्पिटल–मध्ये उपलब्ध आहे. आधुनिक लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध असल्याने अनेक रूग्णांना याचा लाभ होत आहे. लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रियेमुळे रूग्णाला जास्त दिवस हॉस्पिटलमध्ये डमिट राहण्याची गरज राहत नाही. तसेच तो लवकर आपले दैनंदिन जीवन जगू शकतो. याचाही लाभ रूग्णांना होत आहे.

विविध शाळा, कॉलेज, महिला संस्थांच्या कार्यक्रमांना हजेरी लावून डॉ.जाधव आरोग्याचा व महिला सक्षमीकरणाचा मंत्र देत असतात. स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्राजक्ता जाधव यांनी वंध्यत्व निवारणावर विशेष अनुभव मिळवला असून त्याचा अनेक महिलांना लाभ होत आहे. विविध कारणांमुळे सध्या विवाहित जोडप्यांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण वाढले आहे. मूल होत नसल्याने दाम्पत्याच्या जीवनात निराशा येते. अशा दाम्पत्यांसाठी सरस्वती हॉस्पिटलमध्ये आवश्यक तपासण्या, समुपदेशनाची विशेष सुविधा उपलब्ध आहे. त्याचा अनेकांना लाभ झाले आहे. अनेक दाम्पत्यांच्या संसारवेलीवर अपत्य सुखाचा फुल फुलले आहे.

आरोग्यसेवेतील आधुनिक तंत्रज्ञान सरस्वती हॉस्पिटल–मध्ये आणून त्याव्दारे रूग्णसेवा देण्यावर कायम भर देण्यात आला आहे. या जोडीलाच डॉ.जाधव यांनी आनंदी समाजाच्या निर्मितीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहे. आरोग्यसत्ताक चळवळीतून त्यांनी संपूर्ण नगर शहर निरोगी, आरोग्यसंपन्न आणि आनंदी राहिल यादृष्टीने महत्वाचे पाउल उचलले आहे. या अंतर्गत महानगरपालिकेच्या सहकार्यातून विशेष जनजागृती करण्यात आली. कोणताही आजार अंगावर न काढता वेळीच योग्य उपचार, तपासण्या करून घेण्याचे आवाहन ते करतात. आजारावर उपचार करतानाच मुळाच आजार होवूच नये यासाठी जीवनशैलीत कोणते बदल करावेत यासाठीही हॉस्पिटलतर्फे सातत्याने विविध उपक्रमातून जागृती केली जाते.

सातवा वर्धापन दिन साजरा करताना हॉस्पिटलने यंदा मतदार जागृती अभियान सुरु केले आहे. देशभरात सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. लोकशाहीचा हा सर्वात मोठा उत्सव आहे. भारतीय घटनेने प्रत्येक १८ वर्षावरील नागरिकास मतदानाचा समान अधिकार दिलेला आहे. त्यामुळे मतदानातून आपल्या पसंतीचा लोकप्रतिनिधी देशाच्या संसदेत पाठविण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून कर्तव्य आहे. हे कर्तव्य प्रत्येकानेच बजावले पाहिजे. यासाठी हॉस्पिटल नगरमध्ये जागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्याच्या प्रक्रियेत योगदान देत असल्याचे डॉ.जाधव यांनी सांगितले.

केडगाव येथील मनपाच्या ओंकारनगर प्राथमिक शाळेत शाळापूर्व तयारी अभियानांतर्गत मेळाव्याचे फित कापून उद्घाटन करताना अनिल हिवाळे. समवेत मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, नंदा यादव, प्रियंका लोळगे आदी.

विद्यार्थ्यांचे औक्षण करुन व पायाचे ठसे उमटवून दिला प्रवेश

केडगावच्या मनपा ओंकारनगर शाळेत 'पूर्व तयारी' मेळावा

नगर – केडगाव येथील मनपाच्या ओंकारनगर आयएसओ प्राथमिक शाळेत शाळा पूर्व तयारी अभियानांतर्गत मंगळवारी (२३ एप्रिल) मेळावा घेण्यात आला. नव्याने शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत, तर शाळेतील पहिले पाऊल म्हणून पहिलीत नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे उमटवून प्रवेश करण्यात आला.

याप्रसंगी इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या माजी अध्यक्षा नंदा यादव, पत्रकार अनिल हिवाळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका लोळगे, उपाध्यक्षा दीपाली साळवे, सदस्या पल्लवी भुजबळ, संध्या तोडमल, कवित वाघमारे, दुर्गा घेवारे, पूनम बडे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, पालक सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते.

अनिल हिवाळे म्हणाले, अंगणवाडीतून इयत्ता पहिलीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक, मानसिक पातळीवर सर्वांगीण विकास करून जागतिक पातळीवर ते यशस्वी व्हावेत, आदर्श व जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी हे शाळा पूर्व तयारी अभियान राबवण्यात येते. या शाळा पूर्व तयारी अभियानामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाबरोबरच विविध विषयांचा पाया भक्कम होण्यास मदत होणार आहे. इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या माजी अध्यक्षा नंदा यादव यांनीही विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षण घेऊन शाळेचे नाव मोठे करण्याचे आवाहन करुन स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकास, बौद्धिकविकास, भाषा विकास, सामाजिक व भावनिक विकास, गणन पूर्व तयारी याची माहिती देत पालकांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले. या मेळाव्यात शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक व भावनिक विकास, भाषा विकास, गणन पूर्वतयारी हे स्टॉल ठेवण्यात आले होते. प्रत्येक स्टॉल वरून पहिली वर्गात प्रवेश घेतलेले विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून मेळाव्याची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले तर सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी आभार मानले.

केडगावच्या वैष्णवनगर मध्ये चैत्र पौर्णिमेनिमित्त काढण्यात आलेल्या योगेश्वरी देवीच्या पालखी सोहळ्यात सहभागी झालेले भाविक.

केडगावच्या वैष्णवनगरमध्ये योगेश्वरी देवीचा पालखी सोहळा उत्साहात

नगर – योगेश्वरी देवीचा नाम गजर व विविध अभंगांच्या ठेक्यावर ताल धरून नाचणारे भक्तगण, फुगड्या खेळणाऱ्या महिला, ठिकठिकाणी रांगोळी काढून व सडे शिंपडून परिसरातील रहिवाशांनी पालखीचे केलेले स्वागत अशा उत्साही वातावरणात दरवर्षी प्रमाणे चैत्र पौर्णिमेला होणारा योगेश्वरी देवीचा तीन दिवसीय उत्सव केडगावच्या वैष्णवनगरमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

वैष्णवनगर मधील विश्वमाता गायत्री परिवार व जगदंबा सेवा मंडळ यांच्या वतीने चैत्र पौर्णिमेनिमित्त योगेश्वरी देवीच्या प्रतिवार्षिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यभरातून भाविक उपस्थित होते. हे उत्सवाचे ३९ वे वर्ष होते.

गायत्री शक्ती पीठ शांतिकुंज, हरिद्वार यांच्या प्रेरणेने मंगळवारी सकाळी नवकुंडी गायत्री यज्ञ करण्यात आला अशी माहिती चंद्रकांत देशमुख यांनी दिली. यावेळी त्यांनी गायत्री जपाचे महत्व उपस्थितांना विषद केले.

सायंकाळी सहा वाजता मारुती मंदिरा पासून पादुकांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हनुमान सेवा मंडळाचे अध्यक्ष मुरलीधर बालवे यांच्या हस्ते पादुका पूजन करण्यात आले. यावेळी आ. संग्राम जगताप, सचिन कोतकर या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी प्रसाद देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

मिरवणुक व महाआरती नंतर भक्तांना महाप्रसदाचे वाटप करण्यात आले. मंगळवारी रात्रभर देवीचा जागर करण्यात आला.

बुधवारी पहाटे या सोहळ्याची सांगता करण्यात आली. या सोहळ्यासाठी भाविक भक्तांनी परिश्रम घेतले. पूजेचे अधिपत्य संदीप जोशी यांनी केले.

श्री पावन हनुमान मंदिर यांच्यावतीने श्री हनुमान जयंतीनिमित्त पारंपारिक शोभायात्रा व काल्याचे किर्तन

नगर – श्री हनुमान जयंती निमित्त नालेगाव येथे पारंपारिक भव्य शोभायात्रा झाली, यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात व श्री हनुमानाच्या नामघोषाने परिसर अक्षरशा दुमदुमला होता, नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने शोभायात्रे निमित्त रस्त्यावर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती तसेच पालखीचे स्वागत करून फुलांचा वर्षाव करण्यात आला यावेळी महिलांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेत शोभायात्रा झाली. यावेळी भाविक उपस्थित होते.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंतीनिमित्त शोभायात्रा व अखंड हरिनाम सप्ताहाचि सांगता ह भ प मारुती महाराज झिरपे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी आ. संग्राम जगताप, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल आदीसह भाविक उपस्थित होते

श्री पावन हनुमान मंदिराच्यावतीने श्री हनुमान जयंती निमित्त गाडगीळ पटांगणातील आयोजित काल्याचे किर्तन करताना ह.भ.प. मारूती महाराज झिरपे. समवेत आ. संग्राम जगताप, प्रा. माणिक विधाते, दत्तात्रय मुदगल. दुसऱ्या छायाचित्रात शोभायात्रेत सहभागी भाविक. (छाया – लहू दळवी)

श्री हनुमान हे शक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक

श्री हनुमान यांनी प्रभू श्रीरामाची भक्ती श्रद्धा भावनेने केली, धार्मिकतेमध्ये हनुमान हे शक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक म्हणून ओळखले जात आहे, हनुमानासारखी श्रद्धा आपल्या आई–वडिलांवर ठेवा आणि त्यांचा संभाळ चांगला करा आजच्या युगामध्ये धार्मिकतेची परंपरा अखंडितपणे सुरू राहण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन होणे गरजेचे आहे, या माध्यमातून संस्काराचा व विचाराचा वारसा पुढे घेऊन जाता येत असतो नालेगाव मधील मुदगल कुटुंबीयांनी गावपण जोपासण्याचे काम केले आहे असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून समाज एकवटला जात असतो, श्री हनुमान यांचे कार्य महान असून त्यांचे विचार प्रत्येकाने अंगीकारावे, हनुमान हे भक्ती देणारे दैवत आहे संत महंतांचे विचार समाजाला प्रेरणा व ऊर्जा देणारे आहे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह धार्मिक कार्यक्रमाचे केंद्र बनले आहे असे मत ह भ प मारुती महाराज झिरपे यांनी व्यक्त केले.

निमगाव वाघात हनुमान जन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी हनुमानाच्या मुर्तीस अभिवादन करताना पै. नाना डोंगरे, पिंटू जाधव, भरत बोडखे, तुकाराम फलके, सचिन कापसे आदी.

निमगाव वाघात हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा

विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात; ग्रामस्थांची दर्शनासाठी गर्दी

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) गावात हनुमान जन्मोत्सव सोहळा मंगळवारी (दि.२३ एप्रिल) विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात पार पडला. हनुमान मंदिरामध्ये पहाटे विधिवत पूजा व आरती करण्यात आली. तर रात्री भजनाच्या भक्तीरसात भाविक तल्लीन झाले होते.

गावातील भजनी मंडळाने रामभक्त हनुमानजींवर विविध भजन सादर केले. पहाटे मंदिरात अभिषेक करुन आरती करण्यात आली.

यावेळी दिवसभर भाविकांनी हनुमानजींच्या मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांना यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

या धार्मिक कार्यक्रमास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, पिंटू जाधव, भरत बोडखे, तुकाराम फलके, सचिन कापसे, सुरेश जाधव, भाऊसाहेब कापसे, बाबा खळदकर, संदीप डोंगरे, अनिल डोंगरे, पोपट भगत, अजय ठाणगे, गोरख गायकवाड, छगन भगत, दत्तू फलके, विठ्ठल फलके, तुकाराम खळदकर, चंद्रकांत जाधव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. भाविकांना मंदिरात प्रसादाचे वाटप करण्यात आले.

त्रिशला नंदन वीर की जय बोलो महावीर की..., जय महावीर जय आनंद... महावीर स्वामींच्या जयजयकाराने शहरातील दालमंडई परिसर दुमदुमला

जय आनंद
फाउंडेशन

भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त जय आनंद फाउंडेशनच्या वतीने अडते बाजार चौकात आकर्षक सजावट करण्यात आली.

नगर – जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त नगर शहरातून जैन धर्मियांच्या वतीने सकळी शोभायात्रा काढण्यात आली होती. जय आनंद फाउंडेशनच्या वतीने दालमंडई येथे यात्रेचे उत्साहात व भक्तिपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ.सूजय विखे, मर्चंट बँकेचे संचालक व फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, अध्यक्ष रितेश पारख, नगरसेवक सचिन जाधव, डॉ. विजय भंडारी, पोपटलाल भंडारी, प्रा.माणिक विधाते आदींसह फाउंडेशनचे सदस्य व समाजातील नागरिक उपस्थित होते. यावेळी त्रिशला नंदन वीर की जय बोलो महावीर की..., जय महावीर जय आनंद... अशा घोषणांच्या जयजयकाराने दालमंडई परिसर दुमदुमून गेला.

यावेळी शुभेच्छा देताना खा.सुजय विखे म्हणाले, भगवान महावीर स्वामींनी संपूर्ण जगाला अहिंसेचा व जिओ और जिने दो हा बहुमूल्य संदेश दिला आहे. त्यांच्या विचारांवर आज समाजाचे कार्य चालू आहे. फाउंडेशनचे समाजिक क्षेत्रातील व समाजासाठीचे कार्य कौतुकास्पद आहे.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी म्हणाले, फाउंडेशनच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणीक व राष्ट्रीय उपक्रम राबवले जात आहेत. भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या यात्रेचे फाउंडेशनच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात येते.

भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त फाउंडेशनच्या वतीने अडते बाजार चौकात करण्यात आलेल्या आकर्षक सजावट पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी सीए. किरण भंडारी, संजय सुराणा, वैभव मेहेर, सुमीत लोढा, योगेश मुनोत, पवन बिहाणी, सचिन शिंगवी, सुदर्शन दिवटे, किरण कटारिया, गौरव बोरा, महावीर बोरा, कुणाल बडजाते, दिपेश लोढा, आनंद लाहोटी, भूषण बोरा, अनुराग मालू, प्रितेश लुंकड, रोहित चुत्तर, भावेश जामगावकर, आनंद चोपडा, निलेश भंडारी, अमित काबरा व सर्व सदस्य व महिला सदस्य उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भंडाऱ्याचे वाटप

भिंगारमधील सर्व मंडळांचा भाऊ भिंगारदिवे मित्रमंडळाच्या वतीने सन्मान

नगर – भिंगारमधील भाऊ भिंगारदिवे मित्र मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिंगार परिसरातील नागरिकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भंडारा वाटपाचा शुभारंभ नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आला. भंडाऱ्याचा नागरिकांनी लाभ घेतला. याबरोबरच परिसरात घरोघरी भंडाऱ्याचे वाटप करण्यात आले. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास नीलेश लंके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रदीप जाधव, भाऊ भिंगारदिवे, राजू पाटोळे, राजू साळवे, सादिकभाई यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. भाऊ भिंगारदिवे मित्रमंडळाच्या वतीने याप्रसंगी भिंगारमधील सर्व मंडळांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी भाऊ भिंगारदिवे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण आयुष्यभर दीनदुबळ्यांना आधार देण्याचे कार्य केले. त्यांचा वैचारिक वारसा समोर ठेवून भाऊ भिंगादिवे मित्र मंडळाने घेतलेला उपक्रम प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले.

प्रदीप जाधव म्हणाले की, भाऊ भिंगारदिवे मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी आंबेडकर जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी केली जाते. अनावश्यक खर्चाला फाटा देवून परिसरातील सर्वसामान्य नागरिकांसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भाऊ भिंगारदिवे मित्रमंडळ विविध उपक्रमां द्वारे गोरगरीब जनतेला आधार देण्याचे कार्य करत आहे. डीजेवर नाचण्यापेक्षा गरजूंच्या घरात अन्न देऊन पुण्याचे काम करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भिंगारमधील भाऊ भिंगारदिवे मित्र मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिंगार परिसरातील नागरिकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – बबलू शेख)

कॅलिडोस्कोप

तो निरागस भाव...

शेतात स्वच्छंदीपणे बागडणाऱ्या या कोकरालाही फुलांच्या गंधाचा मोह पडला असावा! मग एक क्षण तेही थांबलं, त्याने या गंधात आपलं मन गुंतवलं. पिवळ्या फुलांसोबत हे पांढरं कोकरू खरंच खूप सुंदर दिसतंय...

रम्य साधुपुल हिलस्टेशन

सुट्टीमध्ये निवांत क्षण अनुभवण्यासाठी हिमाचल प्रदेशच्या सुंदर आणि आकर्षक साधुपुल हिलस्टेशनला भेट द्यायलाच हवी. जगभरातून पर्यटकांच्या पसंतीस उतरलेली अनेक हिलस्टेशन्स इथे आहेत. त्यामुळे उन्हाळा असो की हिवाळा इथे पर्यटकांचा ओघ कधीच कमी होत नाही.

सोलन आणि चैल दरम्यानच्या अश्विनी नदीवर हिलस्टेशन वसलेले आहे. येथे जाण्यासाठीचा रस्ता सोलन मार्केटमधून जातो. यादरम्यान सोलनमध्ये असलेला मॉल रोडदेखील आपण पाहू शकतो. या हिलस्टेशनवर देश-विदेशातील अनेक पर्यटक येतात. दिल्लीपासून या हिलस्टेशनचे अंतर ३८८ किलोमीटर असल्यामुळे तिथून सात-आठ तासांत तिथपर्यंतचे अंतर आपण कापू शकतो.

हे हिलस्टेशन कमी गर्दीचे आणि शांत आहे. सिमल्यापासून हे अंतर ३४ किलोमीटर असल्यामुळे ते पाहण्यासाठी पर्यटकांची सतत गर्दी इथे पाहायला मिळते. दिल्ली-एनसीआरमधून अनेक पर्यटक इथे भेट देतात. या ठिकाणी नदीकाठी तंबूमध्ये राहण्याची व्यवस्था आहे त्यामुळे सकाळी उठल्याउठल्या नदीचे दर्शन होते आणि नदीच्या काठी नाश्ता करण्याचे सुख अनुभवायला मिळते.

भलतीच भाषा बोलणारं गाव!

हिमाचल प्रदेशमधलं एक गाव खूपच अनोखं आहे. इथले लोक वेगळ्याच भाषेत बोलतात. मलाणा असं या गावाचं नाव आहे. हिमालयात वसलेल्या या गावाच्या चारही बाजूंना खोल दऱ्या आणि बर्फाच्छादित शिखरं आहेत. या गावात १७०० लोक राहतात. हे गाव पर्यटकांमध्ये बरंच लोकप्रिय आहे. मलाणापर्यंत पोहोचणं सोपं नाही. इथे जाण्यासाठी सरळ रस्ता नाही. डोंगरदऱ्यांमधून वाट काढत जावं लागतं. पार्वती खोऱ्याच्या तळाशी असणाऱ्या जरी नावाच्या गावातून मलाणाला जाता येतं. जरीहून मलाणाला जाण्यासाठी चार तास लागतात. इथले लोक स्वत:ला सिकंदराचे वंशज मानतात. जग जिंकण्यासाठी निघालेल्या सिकंदराने भारतावर हल्ला केला होता. त्यावेळी त्याचे काही सैनिक या गावात आले होते. त्यानंतर हे सैनिक इथून गेलेच नाहीत. ते इकडचेच झाले. आपण सिकंदराच्या याच सैनिकांचे वंशज आहोत, असं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. पण अद्याप हे पूर्णपणे सिद्ध झालेलं नाही. सिकंदराच्या काळातल्या काही वस्तू या गावात सापडल्या आहेत. सिकंदराच्या काळातली एक तलवार याच गावातल्या एका मंदिरात असल्याचं बोललं जातं. इथले लोक कनाशी नामक भाषा बोलतात. ही भाषा जगातल्या कोणत्याही भागात बोलली जात नाही. या भाषेच्या उत्पत्तीबाबत संशोधन सुरू आहे. ही भाषा बाहेरच्या लोकांना शिकवली जात नाही. इथले लोक जमलू नामक देवतेची पूजा करतात. ही जमलू देवता म्हणजे जमदग्नी ऋषी. इथे जमलू देवता आणि त्यांची पत्नी रेणुकेचं मंदिरही आहे.

राजस्थानचे आकर्षक किल्ले

राजस्थानचे नाव घेताच राजवाडे आणि किल्ले आठवतात. या शहरामध्ये तुम्हाला प्रेक्षणीय स्थळांपासून खरेदीपर्यंत अनेक ठिकाणे पाहायला मिळतील. हे शहर ऐतिहासिक किल्ल्यांसाठी जगप्रसिद्ध तर आहेच पण त्यांचा इतिहाससुद्धा जाणून घेण्यासारखा आहे. राजस्थानमधील काही किल्ले पाहण्यासाठी संपूर्ण दिवस लागतो, तर काही किल्ल्यांवरून दिसणारी सुंदर दृश्ये भुरळ पाडतात.

राजस्थानमधील 'तलावांचे शहर' उदयपूरच्या उत्तरेस ८२ किलोमीटर अंतरावर भव्य कुंभलगड किल्ला आहे. मेवाड प्रदेशातील उदयपूर नंतरचा हा सर्वात महत्त्वाचा दुसरा किल्ला असून तो पर्यटकांसाठी खुला आहे. इथून सूर्यास्त पाहणे संस्मरणी असते. जुनागड किल्ला हा राजस्थानमधील बिकानेर शहरातील एक प्राचीन किल्ला त्याच्या भव्यतेसाठी आणि ऐतिहासिक आकर्षणासाठी प्रसिद्ध आहे. या किल्ल्यावर यापूर्वी अनेकदा हल्ले झाले आहेत; परंतु शत्रूंनी तो कधीही जिंकला नाही.

मौर्यांनी सातव्या शतकात बांधलेला चित्तौडगड किल्ला राजपूतांच्या अभिमानाचे प्रतीक आहे. हा प्राचीन किल्ला देशातील सर्वात भव्य किल्ल्यांपैकी एक मानला जातो तसेच राजस्थानमधील सर्वात प्रसिद्ध पर्यटन स्थळांपैकी एक आहे. त्याचे सौंदर्य पाहण्यासाठी या किल्ल्याला नक्की भेट द्या. उदयपूरचा 'सिटी पॅलेस' हा राजस्थानमधील सर्वात भव्य आणि सर्वात मोठा राजवाडा आहे. त्यात अनेक घुमट, अंगण, बुरुज, टेरेस, खोल्या, मंडप, कॉरिडॉर आणि बागा आहेत. सिटी पॅलेसमध्ये ११ आश्चर्यकारक राजवाडे आहेत, जे एकमेकांसारखे दिसतात; परंतु ते वेगवेगळ्या शासकांनी ते बांधले होते. असे ऐतिहासिक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे किल्ले एकदा तरी पाहायलाच हवे.

या कुंडाची खोली किती?

भारतात असंख्य कुंड आहेत. काही कुंडांमधून गरम पाण्याचे झरे वाहत असतात. काही कुंडांमध्ये आंघोळ केल्यानंतर त्वचारोग बरे होत असल्याचा दावा केला जातो. अशाच एका कुंडाचं गुपित अजूनही उलगडलेलं नाही. हे कुंड म्हणजे भीमकुंड. या कुंडाची खोली किती हे कोणालाही माहीत नाही. भीमकुंडाची खोली अजूनही कोणाला मोजता आलेली नाही. याबद्दल फक्त अंदाजच बांधले जात आहेत. हे कुंड मध्य प्रदेशमधल्या छतरपूर जिल्ह्यापासून जवळपास ७० किलोमीटर दूर असणाऱ्या बाजना नामक गावात आहे. या कुंडाचा संबंध महाभारताशी जोडण्यात आला आहे. महाभारतात पांडव अज्ञातवासात होते. वेगवेगळे वेष करून इतस्त: भटकत होते. त्यावेळी त्यांना प्रचंड तहान लागली. मग भीमाने आपल्या गदेने जमीन खोदली आणि हे कुंड तयार केलं. या कुंडाचा आकार गदेसारखाच असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. हे कुंड ४० ते ८० मीटर रूंद आहे. वरून साध्या दिसणाऱ्या या कुंडात बरीच रहस्यं दडली आहेत. हे कुंड एखाद्या नैसर्गिक आपत्तीबाबत सजग करत असल्याचंही सांगितलं जातं. आशिया खंडात भूकंप, सुनामीसारख्या घटना होणार असतील तर कुंडातलं पाणी वाढू लागतं. स्थाानिक प्रशासनापासून नासाच्या शास्त्रज्ञांपर्यंत अनेकांनी या कुंडाची खोली जाणून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले. पण कोणालाही काहीही मिळलं नाही. इथले लोक या कुंडातलं पाणी गंगेच्या पाण्याइतकं पवित्र असल्याचं मानतात.

हात नसले तरी...

हातांशिवाय गाडी चालवता येईल का? बहुतेकजण या प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच देतील. पण हात नसतानाही गाडी चालवता येऊ शकते. केरळच्या जिलुमल मेरियट थॉमस या २८ वर्षीय तरुणीने ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली आहे. तिला आता आरटीओ विभागाकडून परवानाही मिळाला आहे. हात नसतानाही गाडी चालवणारी जिलुमल ही देशातली पहिलीच महिला वाहनचालक आहे. ती गाडी चालवण्यासाठी पायांचा वापर करते. जिलुमलला थॅलिडोमाइड सिंड्रोम आहे. या आजारात मुलांच्या हातापायांचा विकास होत नाही. जिलुमलला गाडी चालवण्याची खूप आवड होती. ती ग्राफिक डिझायनर आहे. तिचे वडील शेतकरी तर आई गृहिणी आहे. डिझायनिंगचं काम करत असतानाच ती एर्नाकुलम यंग वूमन्स ख्रिश्चन असोसिएशची सदस्य बनली. या संस्थेतच तिने गाडी चालवण्याचे धडे घेतले. त्यानंतर २०१४ मध्ये तिने परवान्यासाठी अर्ज केला. पण आरटीओने हात नसल्यामुळे तिला परवाना द्यायला नकार दिला. पण जिलुमल शांत बसली नाही. गाडी चालवणं हे तिचं स्वप्न होतं आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती काहीही करायला तयार होती. आरटीओच्या या निर्णयाला तिने उच्च न्यायालयात आव्हान दिलं. उच्च न्यायालयाने जिलुमलची बाजू उचलून धरली आणि तिला शिकाऊ परवाना देण्याचा आदेश दिला. आपल्या देशात हात नसलेला पुरुष वाहनचालक आहे. जिलुमलने त्याची माहिती न्यायालयात सादर केली. तसंच हात नसूनही गाडी चालवणाऱ्या ऑस्ट्रेलियन महिलेचा व्हिडिओही न्यायालयात सादर केला. तिने २०१८ मध्ये गाडी खरेदी केली. ही गाडी स्वयंचलित असून आरटीओची मार्गदर्शक तत्त्वं आणि जिलुमलच्या गरजेनुसार ती तयार करण्यात आली आहे.

विद्यार्थ्याचे प्रदूषणावर गजब उत्तर

परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील सर्वात महत्त्वाचा भाग असतो. परीक्षेत विद्यार्थी अनेक वेळा विचारलेल्या प्रश्नांना चमत्कारिक उत्तर देत असतात. 'सोशल मीडिया'वर एक अशाच प्रश्नाचे उत्तर व्हायरल झाले. हे उत्तर वाचून अनेक जणांना हसावे की खेद व्यक्त करावा, हे समजले नाही. या मुलाची उत्तरपत्रिका व्हायरल झाली. त्या उत्तर पत्रिकेत प्रदूषणपासून कसा बचाव करता येईल? या प्रश्नाचे गजब उत्तर त्या विद्यार्थ्याने दिले.



बहुत प्यार करते है तुमको सनम, कसम चाहे ले लो खुदा की कसम, हमें हर घड़ी आरजू है तुम्हारी, होती है कैसी सनम बेकरारी, मिलेंगे जो तुमको तो बताएंगे हम, अगर हम यह सब सावधानियां बरतेंगे तभी प्रदूषण से बचा जा सकता है।

व्हायरल झालेल्या उत्तरपत्रिकेत मुलाने प्रदूषणापासून वाचण्याचा उपाय दिला. त्याने उत्तरात म्हटले की, 'गाड़ियों से निकलने वाला धुआं और फैक्ट्री से निकलने वाला पानी और प्रदूषित हवा कम हो जाए, तभी प्रदूषण से बचा जा सकता है' यानंतर त्याने जे लिहिले ते वाचून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. तो लिहितो की, 'बहुत प्यार करते हैं तुमके सनम, कसम चाहे ले लो खुदा की कसम, हमें हर घड़ी आरजू है तुम्हारी, होती है कैसी सनम बेकरारी, मिलेंगे जो तुमको तो बताएंगे हम, अगर ये सब सावधानियों बरतेंगे तभी प्रदूषण से बचा जा सकता है.'

हिंदी चित्रपटातील हे गाणे त्या विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेमध्ये लिहिले. ही उत्तरपत्रिका कोणत्या शहरातील आहे, याची माहिती दिलेली नाही, पण ही पोस्ट हजारो जणांनी पाहिली असून त्याला लाईक केले आहे. त्याच्यावर अनेक प्रकारच्या कॉमेंट आल्या. एका यूजरने लिहिले आहे, भविष्यातील आयएएस अधिकारी. एका यूजरने लिहिले आहे, हे भविष्यातील आयएएस अधिकारी आहेत तर दुसरा म्हणतो, उत्तरपत्रिका वाचल्यानंतर शिक्षक त्या विद्यार्थ्याला शोधत असणार.

या शास्त्रज्ञांची अंगं आहेत सुरक्षित!

या जगात अनेक महान शास्त्रज्ञ होऊन गेले. या शास्त्रज्ञांनी लावलेल्या शोधांमुळे आपलं जीवन सुकर झालं आहे. म्हणूनच आठवण म्हणून जगातल्या तीन महान शास्त्रज्ञांच्या शरीराचा भाग आजही जपून ठेवण्यात आला आहे. गॅलिलिओ गॅलिलिने दुर्बिणीचा शोध लावला. गॅलिलीचं बोट, पाठीच्या कण्याचं हाड आणि अंगठा इटलीमधल्या फ्लोरन्स शहरातल्या संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यात आला आहे. १७३७ मध्ये त्यांचं शव एका कबरीतून दुसऱ्या कबरीकडे आणत असताना कोणी तरी त्यांची ही अंगं काढून घेतली. अल्बर्ट आईन्स्टाईन हे अत्यंत महान व्यक्तिमत्त्व. आईन्स्टाईनच्या मृत्यूनंतर त्यांचे डोळे काढून न्यूयॉर्कमध्ये सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले. इतकंच नाही तर, त्यांचा मेंदूही काढण्यात आला होता. त्यांच्या मेंदूवर अनेक शास्त्रज्ञांनी संशोधन केलं आहे. थॉमस एडिसनने बल्ब, फोनोग्राफ आणि कॅमेऱ्याचा शोध लावला. एडिसन यांच्या अंगाचा भाग नाही तर त्यांनी घेतलेल्या शेवटच्या श्वासाची हवा जपून ठेवण्यात आली आहे. हे ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. म्हणजेच एडिसनचा श्वास आजही अस्तित्वात आहे! हा श्वास एका शोधनळीत सुरक्षित आहे. हा श्वास मिशिगन शहरातल्या एका संग्रहालयात आहे.



खऱ्या अर्थाने महिला राज

महिला सक्षमीकरणाबाबत बरेचदा बोललं जातं. अनेक देशांमध्ये महिलांवर अत्याचार होतात. अनेक ठिकाणी पुरुषप्रधान संस्कृती पहायला मिळते. नाही म्हणायला काही भागांमध्ये मातृसत्ता आहे. अनेक देशांमध्ये महिला आजही आपल्या हक्कांसाठी झगडत आहेत. पण एका देशात महिला पुरुषांना गुलाम बनवतात. या देशात पुरुषांना माणसाप्रमाणेही वागवलं जात नाही. त्यांना प्राण्यांप्रमाणे वागणूक दिली जाते. 'वूमन ओव्हर मेन' हेच या देशाचं घोषवाक्य आहे. इथे महिला पुरुषांना आपल्या मर्जीनुसार वागवतात. पृथ्वीतलावर असा देश अस्तित्वात आहे, हे ऐकून अनेकांना धक्का बसेल. 'अदर वर्ल्ड किंगडम' असं या देशाचं नाव आहे.

Germany
Poland
Prague
Czech Republic
Slovakia
Austria
Hungary

१९९६ मध्ये झेक प्रजासत्ताकमधल्या एका राज्याने स्वत:ला स्वतंत्र देश म्हणून घोषित केलं. पॅट्रिशिया १ ही या देशाची राणी आहे. संपूर्ण देशात तिचीच सत्ता चालते. ब्लॅक सिटी ही या देशाची राजधानी आहे. मात्र या राज्याला देश म्हणून अधिकृत मान्यता मिळालेली नाही. असं असलं तरी या देशाचा स्वतंत्र झेंडा आहे. इथे वेगळी पोलीस यंत्रणा आहे. महिलाच या देशाच्या मूळ नागरिक आहेत. या देशाच्या निर्मितीसाठी दोन दशलक्ष डॉलर्स खर्च करण्यात आले. राणी पॅट्रिशियालाच देशाच्या नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. या देशाचं नागरिकत्त्व मिळवण्यासाठी तिने काही नियम तयार केले आहेत. या देशाचं नागरिकत्त्व मिळवणाऱ्या महिलेने इथले सगळे नियम पाळणं गरजेचं असतं. तिच्याकडे एक पुरुष नोकर म्हणून कामाला हवा. नागरिकत्त्व मिळवण्यासाठी तिने अर्ज करावा लागतो. नागरिकत्त्व मिळवण्यासाठी महिलांना पाच दिवस राणीसोबत रहावं लागतं. महिला राज असणारा हा देश अनोखाच म्हटला पाहिजे...

आकाशात सापडला खजिना!

अंतराळ हे एक गूढ आहे. अंतराळात अनेक गोष्टी दडल्या आहेत. नासा, इस्रोसारख्या संघटना हे गूढ उलगडण्याच्या प्रयत्नात असतात. यातच त्यांना वेगळं काही तरी गवसतं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाला अंतराळात खूप मोठा खजिना मिळाला आहे. या खजिन्याचं मूल्य खूप मोठं आहे. हा खजिना पृथ्वीवरच्या लोकांना वाटला तर प्रत्येकजण अब्जाधीश होईल, असं बोललं जात आहे. नासाला नेमकं मिळालंय तरी काय? जाणून घेऊ. नासाला अंतराळात लोखंडाचं भांडार सापडलं आहे. हे लोखंडाचं भांडार म्हणजे क्षूद्रग्रह आहे. या ग्रहाला '१६ सायकी' हे नाव देण्यात आलं आहे. हा क्षुद्र ग्रह लोखंडाचा आहे. त्याची रूंदी १२० मैल इतकी आहे. या ग्रहात लोखंडासह सोनं, प्लॅटिनम आणि निकेलही आहे. या क्षुद्रग्रहावरच्या धातूंची किंमत आठ हजार क्वॉड्रिलियन पाउंड इतकी आहे. क्वॉड्रिलियन म्हणजे आठ हजारच्या पुढे १५ शून्य. ही रक्कम जगातल्या आठ अब्ज लोकांमध्ये वाटली तर प्रत्येकाच्या वाट्याला जवळपास ९५०० कोटी रुपये येतील. हा क्षुद्र ग्रह पृथ्वीपासून २४ अब्ज मैल लांब आहे. या ग्रहापर्यंत पोहोचण्यासाठी अंतराळ यानालाही चार वर्षं लागतील. नासा या क्षुद्रग्रहावर बरंच संशोधन करणार आहे. यासाठी विशेष मोहिमही राबवण्यात येणार आहे. २०२२ मध्ये या मोहिमेची सुरूवात होणार असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, एरिजोना स्टेट युनिव्हर्सिटीतल्या शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार 'सायको १६' नामक या क्षुद्रग्रहचा शोध १८५२ मध्ये इटलीच्या एनीबेल डी गॅस्परिस या खगोलशास्त्रज्ञाने लावला होता. तसंच त्याला ग्रीक देवतेचं नावही देण्यात आलं होतं.

बालकांची अभिरूची चाचणी अगदी मोफत

नगरमध्ये 'पास ॲकॅडमी' तर्फे ५ ते १५ मे दरम्यान मुला-मुलींसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन

नगर – शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या पास ॲकॅडमीने मागील वर्षापासून व्यक्तिगत शिक्षणाची (Personal tutoring) सुविधा आपल्या नगर शहरात उपलब्ध करून दिलेली आहे. one to one education मुळे बालकाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये व सर्वांगीण विकासामध्ये किती सकारात्मक बदल होतोय हे देखील ॲकॅडमीने वेळोवेळी सिद्ध केले आहे. शिक्षण ही एक आनंददायी प्रक्रिया आहे आणि शिकणाऱ्याच्या स्वतःवरच्या विश्वासातूनच ही शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी होते. हा मूळ विचार ठेवून, स्वतःवर विश्वास ठेवा, BELIEVE IN YOURSELF या संकल्पनेवर आधारीत उन्हाळी शिबीर आयोजित केले आहे. हे उन्हाळी ५ ते १५ मे या कालावधीत सकाळी १०:३० ते ४ या वेळेत होणार आहे. शहरातील मुला-मुलींना (७ ते १४ वर्ष वयोगट) सहभागी होता यावे म्हणून ॲकॅडमीने या समर कॅम्पचे रावसाहेब पटवर्धन सभागृह, प्रोफेसर चौक, सावेडी येथे आयोजन केले आहे. अशी माहिती पास ॲकॅडमीच्या संचालिका प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर यांनी दिली.

या शिबिरात सर्व बालकांची मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून तज्ज्ञाच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात अभिरुची आवडनिवड चाचणी मोफत घेतली जाणार आहे. शिबिरादरम्यान प्रत्येक बालकाचे निरीक्षण नोंदवले जाणार आहे व त्याचा व्यक्तिगत अहवाल तयार केला जाणार आहे. शिबिराच्या शेवटी पालकांना त्यांच्या पाल्याच्या अहवालानुसार सुजाण पालकत्व (GOOD PARENTING) या विषयावर सविस्तर मार्गदर्शनही केले जाणार आहे.

या शिबिरात अनेक विषयाच्या तज्ज्ञांच्या मार्फत प्रात्यक्षिक व मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये बेकिंग, हस्ताक्षर सुधार fruit carving, क्राफ्ट, मातीची भांडी बनविणे, Drawing, Painting, MOM AND ME, DANCE, DRAMA, यासारख्या विविध ॲक्टिव्हिटीमध्ये प्रत्येक मुलाला सहभागी करून विविध नवीन गोष्टी शिकविल्या जाणार आहेत. काही ॲक्टिव्हिटीमध्ये पालकानांही सहभागी केले जाणार आहे. तसेच गणित, सायन्स, इंग्रजी, या शालेय विषयातील गमतीजमती सांगून या विषयासंदर्भातील भीती घालवून त्या विषयामध्ये गोडी वाढविण्याचा प्रयत्नही केला जाणार आहे.

या शिबिराविषयी अधिक माहिती देताना डॉ. आश्लेषा भांडारकर म्हणाल्या की, या शिबिरासाठी मोजक्याच जागा आहेत. तरी पालकांनी आपल्या मुलामुलींना उन्हाळी सुटीचे दिवस मजेत घालविण्यासाठी आणि स्वतःच्या आवडी निवडी समजून घेण्याची हि संधी उपलब्ध करून द्यावी.

समर कॅम्पच्या नोंदणीसाठी ७२७६६८९०११ किंवा ७३८७१२५०११ या क्रमांकावर प्रत्यक्ष संपर्क करावा किंवा whatsapp वर मेसेज करावा तसेच पास अॅकेडमी, सुधांशू, गीते हॉस्पिटलजवळ, बालिकाश्रम रोड या कार्यालयात प्रत्यक्ष भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ॲकॅडमीच्या www.passacademy.in या वेबसाईटला भेट द्यावी.

बालचंद मालू यांचा दीक्षा सोहळा

श्रीरामपूर – येथील जैन समाजातील ज्येष्ठ व मुळा-प्रवरा वीज संस्थेचे सेवानिवृत्त अभियंता मनसुख चोरडीया यांचे सासरे तसेच महिला मंडळाच्या कार्यकर्त्या भारती मनसुख चोरडीया यांचे वडील बालचंद मालू (वय ८४, रा. पुणे) यांचा २८ एप्रिल रोजी जैन भगवती दीक्षा महोत्सव सोहळा मेरठ येथे होणार आहे.

दीक्षार्थी बालचंदजी मालू हे श्रमण संघाचे सल्लागार राजर्षी तपस्वीरत्न गुरूदेव सुमतीप्रकाशजी, उपाध्यक्ष प्रखर वाचनाचार्य डॉ. विशालमुनीजी तसेच उत्तर भारतीय प्रवर्तक राष्ट्रसंत आशिष मुनीजी यांच्या सानिध्यात जैन संत होणार आहेत.

दीक्षार्थी मालूजी हे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. उपाध्याय प्रविणऋषिजी व प्रवर्तक आशिषमुनीजी यांच्या चातुर्मासामध्ये दैनंदिन प्रवचनाचे संकलन करून वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्याचे काम केले. वर्तमान पत्रातील प्रवचन मालिकेवर स्वखर्चाने ऋषीवचन व आशिषधारा ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. पुणे येथील जैन विद्यापीठाच्या प्राध्यापिका नलिनी जोशी यांच्या समवेत प्राकृत भाषेच्या डिक्शनरी तयार करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता.

गत ५ वर्षापासून आशिषमुनी यांच्या सोबत वास्तव्यास असून जैन तत्वाचा अभ्यास करीत असून त्यांनी त्यांचे समवेत जैन भगवती दीक्षा ग्रहण करण्याचा संकल्प केला. २८ एप्रिल रोजी मेरठ (उत्तर प्रदेश) येथे दीक्षा ग्रहण करून जैनमुनी होणार आहे. या दीक्षा महोत्सवास नगर जिल्ह्यातील सकल जैन समाजाने उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीरामपूर दीक्षा महोत्सव समिती व चातुर्मास समितीने केले आहे.

पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सौ.अर्चना सागर काळे व व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय लक्ष्मण डोळसे यांची निवड झाल्यानंतर पतसंस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सौ.अर्चना काळे व व्हा.चेअरमनपदी दत्तात्रय डोळसे

नगर – पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सौ.अर्चना सागर काळे व व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय लक्ष्मण डोळसे यांची निवड झाल्यानंतर पतसंस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संचालक किरण धारक, मनोज क्षीरसागर, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, बाळासाहेब हुचे, संजय धोकरिया, आशा चौरे, अभय काळे, सागर काळे दिपक भागवत, कविता डोळसे, अमृता शिंदे आदि उपस्थित होते.

निवडीनंतर बोलतांना नूतन चेअरमन सौ. अर्चना काळे म्हणाल्या, पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकांच्या एकत्रित प्रयत्नाने आज पतसंस्था प्रगती पथावर आहे. पतसंस्थेच्या विविध योजनांच्या माध्यमातून उत्तुंग भरारी घेत सर्वसामान्य, उद्योजक यांना माफक दरात कर्ज उपलब्ध करुन देत त्यांची प्रगती साधली जात आहे. सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन ठेवीदारांना आकर्षक व्याजदर मिळत आहे. पतसंस्थेच्या चांगल्या कारभारामुळे सर्वांचा दिवसेंदिवस विश्वास वाढत आहे. सर्वांच्या सहकार्याने आपल्यावर चेअरमनपदाची जबाबदारी सोपवली, ती सर्वांना बरोबर घेऊन पार पाडू, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी व्हाईस चेअरमन दत्रात्रय डोळसे म्हणाले, पतसंस्था आपली आहे या भावनेतून प्रत्येकजण काम करत आहे, त्यामुळे पतसंस्थेचा कारभार पारदर्शकपणे सुरु आहे. प्रत्येकाला काम करण्याची संधी मिळत असल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा होत आहे. ग्राहक, सभासद, ठेवीदार यांच्या समन्वयातून पतसंस्थेचा लौकिकात वाढ करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे सांगितले.

याप्रसंगी प्रसाद शिंदे पतसंस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन मनोज क्षीरसागर यांनी केले तर आभार बाळासाहेब हुचे यांनी मानले. नूतन चेअरमन अर्चना काळे व व्हाईस चेअरमन दत्तात्रय डोळसे यांचे अभिनंदन होत आहे.

आर्दशगाव हिवरेबाजारमध्ये महाराष्ट्रात पहिल्या 'हार्टफुलनेस आणि ब्राईटर माइंड प्रोग्रॅम' समारोप

आदर्शगाव हिवरे बाजारमध्ये महाराष्ट्रात पहिल्या हार्टफुलनेस आणि ब्रायटर माईड प्रोग्रॅम शिबीराचा समारोप प्रसंगी पद्मश्री पोपराव पवार, अंजलीताई बापट, शुभम बहेकर, नूरी, गोपाल ऐरोनी, क्षितीजा, चंद्रकांत शिंदे, सुनील वल्लाळ आदी.

नगर – विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या प्रयत्नात, हार्टफुलनेस इन्स्टिट्यूटने हार्टफुलनेस स्कूल कनेक्ट आणि ब्राइटर माइंड प्रोग्रॅम नावाचा परिवर्तनात्मक कार्यक्रम आदर्शगाव हिवरेबाजारमध्ये आयोजित केला. १९ आणि २० एप्रिल रोजी झालेल्या या दोन दिवसीय कार्यक्रमात १०० विद्यार्थी आणि ७ शिक्षकांचा सहभाग होता.

१९४५ मध्ये स्थापन झालेल्या हार्टफुलनेस इन्स्टिट्यूटचे उद्दिष्ट हृदयावर आधारीत ध्यानातुन जागतिक स्तरावर मानवाच्या जिवन शैलीला चालना देण्याचे आहे. आंतरिक शांती मधुन जागतिक शांती या अनुभवावर आधारीत कामातुन त्यांनी १६० देशांमध्ये परिवर्तनात्मक पद्धतींचा परिचय करून दिला आहे.

शाळेमध्ये विज्ञानावर आधारित ब्राइटर माइंड प्रोग्रॅम हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते, जो बौद्धीक स्तरावर मेंदूच्या अमर्याद क्षमतेचा विकास करण्यासाठी न्यूरोप्लास्टिसिटी तत्त्वांचा वापर करतो.

यशवंत माध्यमिक विद्यालयातील काही विद्यार्थ्यांमध्ये दोन दिवसांत सहावा सेन्स क्टिव झाला. ५ ते १५ वयोगटातील मुलांसाठी हा कार्यक्रम राबविला जातो. जो जगभरात प्रसिद्ध आहे. इतर ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा प्रकारे कार्यक्रम राबविण्यासाठी संस्था तयार आहे. जिथे त्या शाळेतील शिक्षकांनाच निशुल्क ट्रेनिंग देऊन तयार केले जाते. ही संस्था संपुर्ण विश्वात निःशुल्क ध्यान शिकवते. कार्यक्रमाचे प्रेरणास्थान पद्मश्री डॉ.पोपटराव पवार होते.

आदर्शगाव हिवरेबाजार, अहमदनगर जिल्ह्यातील शांत, स्वच्छ व निसर्गरम्य परिसरात असलेले हे ठिकाण आत्मनिरीक्षण आणि शिकण्यासाठी एक आदर्श वातावरण प्रदान करते. निसर्गाच्या शांततेत उपस्थित लोक स्वतःला एकमेकांशी जोडू शकले, समुदायाची आणि आपलेपणाची भावना वाढवू शकले.

हार्टफुलनेस इन्स्टिट्यूटचा हार्टफुलनेस स्कूल कनेक्ट आणि ब्राइटर माइंड प्रोग्राम सर्वांच्यासाठी आशा आणि प्रेरणा म्हणून काम करतो, त्यांना आधुनिक जीवनातील गुंतागुंत लवचिकता आणि कृपेने करण्यासाठी मौल्यवान साधनांसह सुसज्ज करतो. कार्यक्रमाचा समारोप होताच सर्व विद्यार्थी आणि शिक्षक नव्या उत्साहाने त्यांच्या आंतरिक क्षमतेची सखोल जाण घेऊन, उज्वल भविष्याच्या दिशेने प्रवास सुरू करण्यासाठी सज्ज झाले.

हार्टफुलनेस मेडीटेशन संस्थेचे महाराष्ट्र व गोवाचे संचालक अंजलीताई बापट, शुभम बहेकर, नूरी, गोपाल ऐरोनी, क्षितीजा, चंद्रकांत शिंदे व सुनील वल्लाळ यांच्यासह पाहुण्यांची उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमामध्ये मोलाची भर घातली व विद्यार्थ्यांनी अनुभव एक दुसऱ्यांना शेअर केले. हार्टफुलनेस संस्थेच्या आगामी कार्यक्रम आणि उपक्रमांबद्दल अधिक माहितीसाठी, https://heartfulness.org/ ला भेट द्या. अथवा ९५०१९०५७६५ या नंबरवर संपर्क साधा.

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा सदुपयोगी मैदानी खेळासाठी व्हावा

हारुण शेख यांचे प्रतिपादन

वर्ल्ड फुनाकोशि शोतोकान कराटे संस्थेच्यावतीने विविध बेल्ट परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसह मुख्य प्रशिक्षक हारुण शेख, प्रशिक्षक रमजान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख आदिंसह यशस्वी विद्यार्थी.

वर्ल्ड फुनाकोशि शोतोकान कराटे संस्थेचे विविध बेल्ट प्रदान

नगर – मुलांच्या आरोग्यासाठी मैदानी खेळ हे आवश्यक आहे. सध्या उन्हाळ्याच्या सुट्टया लागल्या असल्याने त्याचा सदुपयोग मुला- मुलींना मैदानी खेळासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. कराटे खेळामुळे स्व:संरक्षणाबरोबर आत्मनिर्भर बनण्यासाठी फार उपयोगी आहे. आज विविध बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या खेळाडूंनी कठोर मेहनत करुन हे यश संपादन केले आहे. या खेळाडू पुढील स्पर्धांसाठी तयार झाले आहेत. पालकांनी आपल्या मुलांच्या सुदृढ भविष्यासाठी, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीसाठी कराटे खेळास प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन मुख्य प्रशिक्षक हारुण शेख यांनी केले.

वर्ल्ड फुनाकोशि शोतोकान कराटे संस्थेच्यावतीने विविध बेल्ट परिक्षा घेण्यात आल्या. याप्रसंगी मुख्य प्रशिक्षक हारुण शेख, प्रशिक्षक रमजान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख आदिंसह यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

विविध बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झालेले पुढीलप्रमाणे : यलो बेल्ट – कैवल्या नरवडे, शिवतेज वाघ, संचित कुलट, सुजित कुलट, राधेय कांकरिया. ऑरेंज बेल्ट – सोहम फिरोदिया, रिया पालिवाल, दिया गुगळे, शौर्या चिंता, स्पर्श कांकरिया, रिद्धी कांकरिया. ग्रीन बेल्ट – विराज मुनोत, स्वरा कराळे, श्रीहरि इवळे, त्रिशा गुगळे, कस्तुरी नरवडे, सिद्धांत राऊत, रजत काबरा, ईशान राऊत, अनुष्का कोहक, त्रिशा गुगळे, संस्कृती राऊत, संस्कृती नलावडे, नैतिक कंठाळी, वंश काळे. ब्ल्यू बेल्ट – आशकन शाह, पर्पल बेल्ट – सत्यम मुसमुडे, शिवम मुसमुडे.

ब्रॉऊन बेल्ट – दृष्टी पित्रोडा. गोल्डन ब्राऊन बेल्ट – सिद्धी कोरडे, श्रावणी काकडे, मिहिर जोशी. ब्लॅक बेल्ट – काव्य उदावंत, गणेश भुजबळ. फस्ट डेन – पार्थ चतारे, अहना भंडारी. यावेळी दिपाली भालेराव, सायली सुपेकर, महेक शेख, विधी गुंदेचा, ऋषीकेश ललवाणी, आशिष शिंदे, स्वराज नारायणे, ईशान होशिंग, अदित्य बोरा, पार्श्व भंडारी आदि ब्लॅक बेल्ट उपस्थित होते.

के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत.

के. जी. कला महाविद्यालयात पुस्तक दिन साजरा

नगर – के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुस्तक वाचन ही एक चांगली सवय आहे. वाचनाने आपल्या ज्ञानात वाढ होते असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त आपण त्या महान व्यक्तींचे स्मरण करतो ज्यांनी आपल्या लेखनातून जगाला एक नवा मार्ग दाखवला आहे असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी ग्रंथपाल सौ.हर्षाली रासकर यांनी पुस्तक दिनाविषयी आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. वर्षा कीर्तने यांनी मानले. याप्रसंगी डॉ.प्रशांत खोपटीकर, डॉ.स्नेहल बोरावके, प्रा.आरती खेडकर, संतोष मुनोत व विद्यार्थी उपस्थित होते.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून माजी सैनिकांच्या भारतीय जवान किसान पार्टीचे अधिकृत उमेदवार भाऊसाहेब वाबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. समवेत मनसुख वाबळे, भगवान कैल्हे, संजय ढगे, कारभारी खोमणे. (छाया – बबलू शेख)

माजी सैनिकांच्या भारतीय जवान किसान पार्टीचे भाऊसाहेब वाबळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

नगर – सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत ३७- अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून माजी सैनिकांच्या भारतीय जवान किसान पार्टीचे अधिकृत उमेदवार भाऊसाहेब वाबळे (मेजर) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

समवेत मनसुख वाबळे, रावसाहेब देवकाते, भगवानराव कोल्हे, युनूस टेंगे, सागर रासकर, रावसाहेब कुलट, कॅप्टन बशीर शेख, अमर वागस्कर, केकती संघटना अध्यक्ष मच्छिंद्र वाघस्कर, रमेश पिंगळे, कारभारी खोमणे, संजय ढगे, संतोष खोमणे, उत्तम बेंडकुळे, मिलिंद बसाटे व सर्व सैनिक संघटनाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

भाऊसाहेब वाबळे म्हणाले भारतीय जवान किसान पार्टी ही सर्वसामान्य जनतेची पार्टी आहे जवान, सर्वसामान्याकरीता काम करणारी पार्टी आहे माजी सैनिकांनी मिळून देशहीतासाठी कार्य करणारी ही पार्टी स्थापन केली आहे. सर्वसामान्यांची जी सध्या ससेहोलपट होत आहे कोणाचा कोणावर विश्वास राहीला नाही आम्ही माजी सैनिक म्हणून देशाच्या कर्तव्यनिष्ठेतेपायी भारतीय जवान किसान पार्टी स्थापन केली आहे जेणेकरून सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी काम करणार आहोत.

भगवानराव कोल्हे म्हणाले की, नगर दक्षिणमधील सर्व संघटना एकत्रित येउन आम्ही फॉर्म भरला असून पहीले पाउल उचलले आहे. सैनिक हा शेतकऱ्यांचा मुलगा असतो देशसेवा करून तो समाजासाठी काहीतरी करू इच्छितो आमचे बरेचे प्रश्न प्रलंबित आहे. सैनिकांकडे बऱ्याचवेळा दुर्लक्ष केले जाते शेतकऱ्यांना दुध, कांदा हे कवडीमोलाने विकावे लागते. शेतकरी व सैनिक त्यांच्या विधवा पत्नी तसेच त्यांच्यावर अवलंबून आहेत अश्याना न्याय द्यायचा आहे हे उद्दिष्ट ठेवून आम्ही अर्ज भरला आहे.

मतदार जनजागृतीसाठी स्वीप मास्टर पुरस्काराचे आयोजन

व्यक्ती, संस्था, शाळा, महाविद्यालये यांना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन



नगर – जिल्हाधिकारी तथा अहमदनगर जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर-शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० % मतदानाची भूमिका बजवावी त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी) यांच्या संकल्पनेतून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने स्वीप मास्टर पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असून व्यक्ती, संस्था, विविध कार्यालये, शाळा/महाविद्यालये यांना प्रस्ताव पाठवण्यासाठी आवाहन स्वीप समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

सक्षम मतदार, दिव्यांग मतदार, वंचित महिला घटक मतदार, तृतीयपंथी मतदार, ईव्हीएम व्हीव्हीपॅट विषयक जनजागृती, ८५+मतदार जनजागृती, २०१९ मध्ये कमी मतदानाची टक्केवारी असलेल्या क्षेत्रातील केलेल्या मतदार जनजागृतीच्या उपाययोजना, पोस्टल बॅलेट मतदान, टपाली मतदान, विना मोबदला मतदान, शंभर टक्के मतदान, नवमतदार युवक-युवतींचा सहभाग या विविध विषयांवर स्वीप उपक्रम अपेक्षित आहेत.

विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन (निबंध, चित्रकला, रांगोळी, पथनाट्य, मतदार जनजागृती गीत निर्मिती, मेहंदी, पोस्टर, घोषवाक्य, व्हिडिओ/ रील बनवा आदी स्पर्धा) रॅलीचे आयोजन, मतदान करण्याची शपथ घेणे, सार्वजनिक ठिकाणे-सभा संमेलने आदी ठिकाणी मतदान जनजागृती करणे, स्वतःच्या सोशल मीडियाचा वापर मतदार जनजागृतीसाठी करणे यासंबंधी संकल्पना अपेक्षित आहेत. सर्व उपक्रमांमध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे.

सहभागी होणाऱ्या घटकांनी आपला प्रस्ताव कामाचा तपशील, छायाचित्रे, वृत्तपत्र कात्रणे, प्रमाणपत्रे, प्रशस्तीपत्रे आदींच्या एका झेरॉक्स प्रतीमध्ये स्वतःचे/संस्थेचे/ कार्यालयाचे/शाळा महाविद्यालयाचे संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबरसह १० मे पर्यंत जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग, जुन्या बसस्थानकासमोर माळीवाडा, (मु.पो.ता.ज़ि.नगर – ४१४००१ या ठिकाणी समक्ष /पोस्टाने/कुरिअरद्वारे जमा करावयाचे आहे. अधिक माहितीसाठी डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) यांच्याशी ९५९५ ५४ ५५५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.SVEEP- स्वीप या शब्दाचा अर्थ Systematic Voter's Education and Electoral Participation म्हणजेच निवडणूक-मतदान प्रक्रियेत मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग असा अर्थ होतो.

जास्तीत जास्त व्यक्ती संस्था व कार्यालये यांनी स्वीप मास्टर पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), मीना शिवगुंडे (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), आकाश दरेकर (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), प्रदीप पाटील (तहसीलदार-निवडणूक), बाळासाहेब बुगे (उपशिक्षणाधिकारी), प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

भगवान महावीर जयंतीनिमित्त गंज बाजार येथे मित्र मंडळाच्यावतीने शोभायात्रेतील भाविकांना पाणी बाटल्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगर शहर भाजपा सरचिटणीस प्रशांत मुथा, गोपाल वर्मा, यश मुथा, संकेत गुरव, ओम दळवी, शुभम सानप, नितीन कांकरिया, बिपिन विराणी व शिव मित्र चौक कार्यकर्ते उपस्थित होते.

त्वरीत भाड्याने पाहिजे

अहमदनगर शहर व शहरालगत
२५००–३००० स्क्वे.फू.
पक्के बांधकाम असलेली
जागा, हॉल, इमारत इ. क्लासेस करिता
त्वरीत भाड्याने पाहिजे आहे.

(एजंट क्षमस्व:) संपर्क – **Mo. 9028787359 / 9145155955**

अ.नगर शहराच्या अत्यंत मध्यवर्ती ठिकाणी दिल्लीगेट, सातभाई मळा येथील

स्वतंत्र इमारत भाड्याने देणे

ऑफीस अथवा कॉर्पोरेट कंपनी गेस्ट हाऊस, कोचिंग क्लासेस, एच. आर., एन. जी. ओ. यांना उपयुक्त, प्रशस्त पार्कींग सुविधेसह ८००० चौ. फुटाचे क्षेत्रफळ व ४००० चौ. फुट बांधकाम असलेली इमारत भाड्याने देणे आहे.

संपर्क : 8668567601

GALAXY

विकणे आहे

- ✻ 2 BHK फ्लॅट ८६० स्क्वे.फूट, फूल फर्निचरसह लक्झरी फ्लॅट,पत्ता : कायनेटिक चौक, रविश कॉलनी.
- ✻ 2 BHK रो-बंगलो नवीन बांधकाम लक्झरी बंगलो विकणे आहे. पोदार स्कूलजवळ, भूषणनगर.
- ✻ रो-हौसिंग विकणे आहे. भूषणनगर, केडगाव

8530971110, 9823155939 (एजंट क्षमस्व)

कापड बाजार येथे गोडावूनसाठी गाळे भाड्याने देणे आहे

– अधिक माहितीसाठी संपर्क –
9270570699

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री– पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

सेक्स समस्या

वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

ISO मानांकन प्राप्त **सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर–पुणे रोड, अहमदनगर

संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

दुमजली घर विकणे

योग्य किंमतीत, बालिकाश्रम रोड
लक्ष्मीमाता मंदिराजवळ
तुळशी पार्कसमोर,जाधवमळा.
संपर्क : ६ ते ९
8446062089
9730292394

गाळा भाड्याने देणे आहे

वाकोडी फाटा, नगर–सोलापूररोड लगत, राहिंज टॉवर्स ४८० स्क्वे.फूट फुल्ल फ्रंट शटर हॉल गाळा पहिल्या मजल्यावर ऑफिस, क्लासेस, शोरुम, पतसंस्थारिता भाड्याने देणे आहे.

9028998747

सरकारमान्य संस्था घरबसल्या रोज ५०० ते १००० रु. कमवा

बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा..
माल फ्री घरपोहोच

धनश्री उद्योग
अंबर प्लाझा बेसमेंट, नमो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

Required in Nagar MIDC

Accountant (M/F)- 02
B.Com/BBA With Tally
(Experience Min 1 year)
Salary: Rs.13000 to 15000
Whatsapp your biodata
9623 688 355

चाहिए

सेफ सिक्योरिटी ॲण्ड अलाइड सर्व्हिस को भारी मात्रा में सिक्योरिटी गार्ड और हेल्पर, वेल्डर और हाऊसकिपिंग की आवश्यकता है ।
पगार ८००० ते १८००० रु.
7020839133
8081919753

वर पाहिजे

वधु २७, ५.२, १२ वी,
हिंदू–कुणबी समाज
मुलगी मेहंदी व आर्ट डेकोरेशन क्लास घेते

आई नाही, १ बहिण,
बाबा शुगर फॅक्टरीत कामाला

गरीब घरातील सुंदर मुली करिता हिंदू समाजातील सर्वजातीय सामान्य वर चालेल

– संपर्क –
8421168826
7517049173

पाहिजेत

- ✻ सेल्समन – २ जागा
- ✻ ड्रायव्हर – २ जागा (अनुभवी)
- ✻ कामगार (मुले–मुली)

राज मार्केटींग
ब्रिटानिया व गायछाप चे अधिकृत विक्रेते
शॉप नं १५०४, वंजार गल्ली,
रायगड चौक, राऊत हॉस्पिटल जवळ,
गोविंद ट्रान्सपोर्ट समोर, अ.नगर.
9028888171

एजंट नेमणे

एका नामांकित सॉफ्टवेअर कंपनीसाठी कमिशन बेसीस मार्केटींग एजंट नेमणे आहे.

9119431984

ड्रायव्हर पाहिजे

अहमदनगर मधील नामांकित पारस ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज मध्ये बोथरा फौंड्री, इंडस्ट्रियल इस्टेट, केडगांव, अहमदनगर येथे फोर्स १४ सिटर बस करिता अनुभवी, निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. योग्य पगार दिला जाईल.

अधिक माहितीसाठी संपर्क ✆ **9422081954**

पाहिजेत

- ✻ टेक्निशियन : ४ जागा
- ✻ अकौंटंट : २ जागा
- ✻ हेल्पर : ४ जागा
- ✻ सुपरवायझर : २ जागा
- ✻ सेल्सकरिता : ४ जागा

(अनुभवींना प्राधान्य)

चेतक बजाज शोरुम
गुरु फर्निचर समोर,नगर–मनमाड रोड, सावेडी, अ.नगर

अहमदनगरमधील एक्सक्लुझिव्ह फर्निचर शोरूमसाठी

पाहिजेत

फर्निचरच्या दुकानातील कामाचा अनुभव, उत्तम संभाषण.
जेंटस/ लेडीज
वय १८ ते ४० वर्ष
आर्जासह समक्ष भेटा.

विजय ट्रेडिंग कं.
तेलीखूंट पावर हाऊस समोर
अ.नगर मो. 7517404530

पाहिजेत

पॅकिंग साठी लेडीज़ - 2 जागा
मुले - 2 जागा
हेल्पर - 1 जागा

अर्जासोबत समक्ष भेटा

बारा फुडस्

कोहिनूर प्लाझा, **पत्रकार चौक**
लोकमत भवन शेजारी,सावेडी रोड, अ.नगर

We are Hiring

Be a part of Volkswagen.
Here's an opportunity for you to dream bigger.

Designation	Position	Qualification
1. Workshop Manager	(M/F -1)	DAE, DME, BE Mech/Auto, AMIE
2. Sales Consultant	(M/F -3)	Min 12th Pass
3. Accountant	(M/F -1)	B. Com or equivalent
4. Bodyshop Advisor	(M/F -1)	ITI or Any Graduate
5. Service CRE	(F -1)	Any Graduate
6. Sales CRE	(F -1)	Any Graduate
7. Technicians	(M -3)	ITI must

Experience: Min 1-2 years relevant experience in similar post.
Excellent Salary & Incentive: at par with industry standard.
Good communication skills: Marathi, Hindi & Basic English.
Comfortable working hours: child friendly for Females.
Brand training will be provided for all the above posts.
Laptops, Mobile phone will be provided for certain posts.

Walk-in interviews open for the next 10 days, from 10 am to 1:30 pm.

Volkswagen Ahmednagar
Next to Govt. Doodh Dairy, Nagar Shirdi Road,
MIDC, Ahmednagar, 414111
Please email your CV to info@vw-hkmpl.co.in
You can also WhatsApp CV to 7757000332.

CARE CATALYST

Customised Footwear

Protection / Healing / Correction
For Comfortable Walk

Foot Care Lab

Useful for

- Diabetic Ulceration
- Knee Pain
- Corn/ Callus
- Heel Pain
- Flat Foot

Contact Now
Time: 10-1pm 4:30 -8pm Sunday Closed
Shop no 3, Devgavkar Chambers,
Gulmohar Road, Savedi, Ahmednagar
87933 16254

---

greenlibrary.in

EARTH's **Green Library**
Greenery for Every Space

Bring Nature's Serenity Home.

Get Live Indoor Plant Today !

Indoor Plants | Self Watering | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools,
Zopadi Canteen, Savedi, Ahmednagar - 414003
Amit Ajay Sanklecha ✆ **99231 43334**

तीर्थयात्रा दर्शन

उत्तराखंड चार धाम तीर्थयात्रा दर्शन व सत्संग

केदारनाथ
बद्रीनाथ
गंगोत्री
यमुनोत्री
हरिद्वार
ऋषीकेश

✻ यात्रा प्रारंभ : २० ऑगस्ट २०२४ ते ०४ सप्टेंबर २०२४
✻ प्रवास : १६ दिवस

यात्रा वर्गणी
– प्रति व्यक्ती स्लीपर कोच : 26,000/- रु.
– ए.सी. 3 टायर : 29,500/- रु.

आयोजक : माऊली महाराज राजळे – मो. 9623508987

बुकिंग करिता संपर्क : डॉ. वृषाली महांडुळे (बूथ हॉस्पिटल)
मो. 8208470524

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 19 ते 26 एप्रिल 2024

बडे मियाँ छोटे मियाँ	8.00 AM, 11.10 AM, 2.15 PM 7.00 PM, 11.00 PM
गॉडझीला द काँग	5.25 PM
द लेजेन्सी ऑफ जीनेश	7.40 PM, 10.00 AM
मैदान	8.30 AM, 12.00 PM 6.45 PM, 10.15 PM
स्वातंत्र्यवीर सावरकर	3.25 PM
राजकारण गेल मिशीत (मराठी)	4.00 PM 10.30 PM
क्रु	1.25 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

ज्योत अनंतात विलीन झाली, स्मृती आठवणींनी दाटून आली
भावसुमनांची ओंजळ भरुन वाहतो, आम्ही आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली !!

स्व.सुरेखा बबन गोसके
(स्व. १६/०४/२०२४)

दशक्रिया विधी

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, आमची आई **स्व.सुरेखा बबन गोसके** यांचे मंगळवार दि.१६/०४/२०२४ रोजी दु:खद निधन झाले. तरी त्यांचा **दशक्रिया विधी** गुरुवार दि.२५/०४/२०२४ रोजी सकाळी ८.३०, नालेगांव, अमरधाम, अ.नगर येथे होणार आहे.

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दु:खांकित :

समस्त गोसके परिवार
श्रीनिवास बोगा व दिकोंडा परिवार

दशक्रिया विधी

साथ सुटली लाख मोलाची, छाया विरली वटवृक्षाची..
ज्योत विझली आशेची,
वाट पाहतो आम्ही आपल्या पुन: जन्माची!

दशक्रिया विधी : शुक्रवार
दि.२६/०४/२०२४ रोजी स.८.३० वा.
ठिकाण : भिंगार अमरधाम,
शुक्लेश्वर मंदिराजवळ.

ह.भ.प.दिनेश बुक्कन महाराज यांचे प्रवचन होणार आहे.

कै.वनाजी चुनीलाल राऊत
स्व.दि.१६/०४/२०२४

✻ दु:खांकित ✻

गं.भा.रंजना वनाजी राऊत (पत्नी) । गं.भा.सुमन भागवत होले (बहीण)
सुनील वनाजी राऊत (मुलगा) । अजय वनाजी राऊत (मुलगा)
संगीता सुनील राऊत (सून) । शितल अजय राऊत (सून)
जयश्री राजेश आंबेकर (मुलगी) । मंगल मनोज कदम (मुलगी)

नातू : आशिष, आदित्य, अजिंक्य, यश
नाती : अंकिता, निकिता, गौरी, वैष्णवी, वैभवी, वृषाली, शिवानी, पणतू : अंश,
पणती : आंशिका, सानवी, साईशा

समस्त राऊत परिवार, नातेवाईक, मित्र परिवार

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training

MAHA DiSCOUNT

Just in **1800** Any Course offer

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME
PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR
INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD

JOIN TODAY

MAHA DiSCOUNT

FEATURES OF DISHA E-LEARNING APP
Digital Certificate
Video Tutorials
Question bank for Practice
Online exam

Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights,
Above Supekar Medical, Delhi Gate,
Ahmednagar-414001
9371051769

Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza,
Near Lokmanthan Office,
Near Maliwada Stand, Station Road,
Ahmednagar-414001
9371151769

Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha
Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road,
Ahmednagar, 414003
7447761769

केदारनाथ धाम दर्शन

५ रात्री / ६ दिवस
दिनांक : १५/०६/२०२४
रेल्वे प्रवास । बस प्रवास । भोजन
निवास इ. व्यवस्थे सह

प्रति व्यक्ति – 9501/-₹ | 3AC- 11501/-₹

।। जय केदार बाबा ।।
।। श्री कुलस्वामिनी प्रसन्न ।।
श्री सुविधा यात्रा कंपनी संचलित
AMAR PREM

अमर प्रेम हॉलिडेज

हेड ऑफिस – श्री. सचिन रामभाऊ म्हस्के / सौ. सारिका सचिन म्हस्के
युनिय बँकेसमोर, चितळे रोड, अ.नगर मो. ९२२६३९९५५५ / ९६५७७४६५५५ Holidays & Multiple Services

पुणे ऑफिस – सौ. संगिता महेश कंठाळे
श्रीमती. मिनाक्षी सोन्याबापु कंठाळे
संभाजीनगर, चिंचवड, पुणे -१९
मो. ९१६८०५५१५९ / ९८१९९२२७०१

नाशिक ऑफिस – श्री. प्रमोद नामदे
शॉप नं. ७, स्टेशन रोड, अष्टेकर ज्वेलर्स मागे,
नाशिक रोड, नाशिक
मो. ९८२२२८११२५ / ८१४९३२४४०३

जालना ऑफिस – श्री. कुणाल झारखंडे
शॉप नं. ४१, मंठा रोड, आझाद मैदान
कॉम्प्लेक्स, जालना मो. ९५९५१५०९९९

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१. मिळकतीचे वर्णन – डिाा अहमदनगर सब डिव्हीजन व तालुके नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर यांचे कक्षेतील **खजुरगल्ली** भागातील घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –

सिटी सर्व्हे नंबर	म्युनिसिपल घर नं.	क्षेत्रफळ
३४०१	३७४७, ३७४८, ३७५९	३७९.६ चौ.मी.

यापैकी चित्रा टॉकीज रोड लगतचे राठोड यांचे मालकीचे १७८.२६ चौ.मी. व सरोदे यांचे मालकीचे ११.५४ चौ.मी. क्षेत्र.

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे –

पुर्वेस – सि.स.नं. पैकी उर्वरीत भाग व पुढे बोळ,
दक्षिणेस – सि.स.नं. ३४०२,
पश्चिमेस – चित्रा टॉकीज रोड व वाग.
उत्तरेस – सि.स.नं.३४००

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक घर मिळकत यातील बांधकामासहीत लाईट कनेक्शन, नळ कनेक्शन तसेच वागणुकीचे व वहिवाटीचे सर्व हक्कासहीत काहीही एक राखुन न ठेविता.

वर नमुद केलेली मिळकत ही रचना रूपेश चौहान, विनया अमोल ठाकुर, दिव्या अमोल राठोड, शशिकला अनिल राठोड, विक्रम अनिल राठोड यांच्या मालकीचे क्षेत्र १७८.२६ चौ.मी. व विजय दत्तात्रय सरोदे यांचे मालकीचे ११.५४ चौ.मी. क्षेत्र अशी मिळकत आहे. सदरील मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याबाबत विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांना खात्री व भरवसा देऊन कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल करून विसारापोटी रक्कम स्वीकारलेली आहे.

सबब वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लिज, अन्नवस्त्र, करार, मदार, साठेखत अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासुन **सात दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष कागदपत्रानिशी भेटुन खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार न आल्यास मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही.

अहमदनगर
तारीख– २४/०४/२०२४

ॲड.एम.बी. आंबेकर (बी.ए.,एल एल.बी.)
रा. आंबेकर मळा, सारसनगर मार्केट यार्ड,
अहमदनगर.
मो.नं.९८२२८१६८६४

हिमालय, पारस, प्लास्टो व सिंटेक्स

या कंपन्यांचे १०० लिटर ते ५००० लिटर
पर्यंतच्या टाक्या १० वर्षे गॅरंटीसह

Himalaya
3 Layer
PLASTO
RUF - TUF
पारस
TRIPLE LAYER
Sintex neo

प्रो.प्रा. सुनिल बनकर पा.

मे. अभय सेल्स
कॉर्पोरेशन अँड हार्डवेअर

सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पिटल
शेजारी, सातभाई मळा, दिल्लीगेट, अ.नगर.
8975979999 ✆ 9822542011